POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३५१ ● मुंबई, मंगळवार, २२ जूलै २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## ‘कोकाटे बेशरम, निर्लज्ज! शिस्तप्रिय अजित पवार आता...’
## रमी व्हिडीओवरुन शरद पवार गट आक्रमक... ‘दुपारपर्यंत राजीनामा...’

**■मुंबई | प्रतिनिधी :**
राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंचा विधानसभेच्या सभागृहात मोबाईलवर रमी खेळताना व्हिडीओ समोर आल्याने एकच खळबळ उडाली आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी हा व्हिडीओ शेअर केला असून त्यावरुन आता टीकेची झोड उठल्याचं पाहायला मिळत आहे. या प्रकरणावरुन आता शरद पवारांच्या राष्ट्रवादीने आक्रमक भूमिका घेतली असून थेट उपमुख्यमंत्री अजित पवारांचा उल्लेख करत निशाणा साधला आहे. शरद पवारांच्या पक्षाच्या आमदाराने हा व्हिडीओ पाहिल्यानंतर कोकाटेंचा 'बेशरम', 'निर्लज्ज' असा उल्लेख केला आहे.




**खिल्ली उडावणारी पोस्ट**

शरद पवारांच्या पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी माणिकराव कोकाटांचा विधानसभेत रमी खेळतानाचा व्हिडीओ समोर आल्यानंतर त्यांची खिल्ली उडवणारा एक फोटो आपल्या अधिकृत एक्स हॅण्डलवरुन शेअर केला आहे.

**ज्या रमीमुळे ३ ते ४ पोरांनी आत्महत्या केली**

''बेशरम, निर्लज्ज माणूस आहे तो (माणिकराव कोकाटे). एकीकडे हाहाकार माजला आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीमुळे सरकार किती खोटं आहे हे शेतकऱ्यांमध्ये पसरलं आहे. एक माणूस परिस्थितीमुळे नांगर खांद्यावरुन ओढताना दिसत आहे. हे सगळं होत असताना, उद्धटपणाने वागण्यासाठी प्रसिद्ध असलेले माणिकराव कोकाटे सभागृहात रमी खेळताना दिसत आहेत. ज्या रमीमुळे ३ ते ४ पोरांनी आत्महत्या केली. जुगार हा गुन्हा आहे. मंत्री विधानसभेत जुगार खेळताना दिसतोय,'' असं म्हणत आव्हाड यांनी माणिकराव कोकाटेंवर टीका केली. पुढे आव्हाड यांनी अजित पवार काय कारवाई करतात हे पाहणं महत्त्वाचं असल्याचं म्हटलं आहे.

**अजित पवारांचा उल्लेख करत साधला निशाणा**

''आता बघूयात जगाला शिस्त शिकवणारे, शिस्तप्रिय अजित पवार आता काय करतात. दुपारच्या आत त्यांच्या राजीनामा घ्यायला हवा,'' असं आव्हाड यांनी म्हटलं आहे. ''भाजपाचा आमदार मकोकाचे आरोपी घेऊन येतो. मारण्यासाठी खाणाखुणा करतो. आत त्यांचे लोक जाऊन मारतात. हे सरकार म्हणजे केवळ गुंडाराज, जंगलीराज आहे की काय?'' असा सवाल आव्हाड यांनी उपस्थित केला आहे.

**रमी मास्टर कृषीमंत्री**

आव्हाडांनी शेअर केलेल्या फोटोमध्ये 'रम्मी मास्टर कृषीमंत्री' असा मथळा लिहिलेला आहे. या फोटोमध्ये माणिकराव कोकाटेंच्या हातात मोबाईल दाखवण्यात आला आहे. कोकाटेंनी फेटा परिधान केला असून हसताना दिसत आहेत. त्यांच्या हातातील मोबाईलमध्ये, 'विसरा शेती, खेळा रमी, मिळणार नाही शेतमालाची हमी,' असं लिहिलेलं असून खाली पत्ते दाखवण्यात आले आहेत. फोटोमध्ये मागील बाजूला काही लोक रमी खेळताना दाखवण्यात आलेत. हा फोटो आव्हाड यांनी, 'शेतकऱ्यांनो विसरा हमी....खेळा रम्मी...' अशा कॅप्शनसहीत शेअर केला आहे.

## युतीसाठी उद्धव ठाकरेंची पुन्हा एकदा राज ठाकरेंना साद

**■मुंबई | प्रतिनिधी :**
उद्धव ठाकरेंनी पुन्हा एकदा राज ठाकरेंना युतीसाठी साद घातलीय. राज ठाकरेंना मी कधीही भेटू, आणि बोलू शकतो असं विधान युतीच्या प्रश्नावर उद्धव ठाकरेंनी केलं आहे. दरम्यान उद्धव ठाकरेंच्या या विधानानंतर मनसे नेते बाळा नांदगावकरांनी देखील सकारात्मक प्रतिक्रिया दिली आहे.

उद्धव ठाकरेंकडून युतीसाठी वारंवार राज ठाकरेंना साद घातली जातेय. आजही उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंसदर्भात मोठं विधान केलंय. राज ठाकरे यांना कधीही भेटू आणि फोन करू शकतो असं वक्तव्य उद्धव ठाकरेंनी संजय राऊतांनी घेतलेल्या महामुलाखतीत केलं आहे. एवढंच नव्हे तर दोन्ही बंधूंच्या युतीच्या मुद्द्यावरून उद्धव ठाकरेंनी सत्ताधा-यांवर देखील शरसंधान साधलंय. तर दोन्ही भाऊ कधीही भेटू, बोलू शकतात असं सकारात्मक विधान मनसे नेते बाळा नांदगावकरांनी केलं आहे.

मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेच्या युतीसंदर्भात विनायक राऊतांनी देखील महत्त्वाचं वक्तव्य केलंय. निवडणुका जाहीर झाल्यानंतरच युतीचा निर्णय होणार



असल्याचं मोठं विधान त्यांनी केलंय. तर दुसरीकडे युतीच्या चर्चांवरून शिंदेंच्या शिवसेनेनं उद्धव ठाकरेंना चांगलाच टोला लगावलाय.

सामनाला दिलेल्या महामुलाखतीच्या पहिल्या भागात देखील उद्धव ठाकरेंबाबत मोठं विधान केलं होतं. राज ठाकरे आता माज्यासोबत आहेत. समाजाच्या हितासाठी आमचा संघर्ष सुरू असल्याचं उद्धव ठाकरेंनी म्हटलं होतं.

मनसेसोबत युतीसाठी उद्धव ठाकरे कमालीचे सकारात्मक आहेत. राज ठाकरेंसमोर देखील उद्धव ठाकरेंनी त्यांची रोखठोक भूमिका मांडली होती. मात्र, दुसरीकडे राज ठाकरेंनी अजूनही आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे मराठीसाठी एका मंचावर येणारे हे दोन्ही ठाकरे बंधू आगामी पालिका निवडणुकीच्या मैदानात एकत्र उतरणार का? याकडे आता महाराष्ट्राचं लक्ष लागलंय.

## ठाकरे बंधूंच्या संभाव्य युतीआधीच एकनाथ शिंदेंचा राज ठाकरेंना मोठा धक्का

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि राज ठाकरेंची महाराष्ट्र नवनिर्माण सेना युती करुन लढणार की नाही याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे. शालेय अभ्यासक्रमामध्ये पहिल्या इयत्तेपासून त्रिभाषासुत्री लागू करण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या शासन आदेशाविरोधात राज आणि उद्धव या दोन्ही ठाकरे बंधुंनी आवाज उठवल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने यासंदर्भात समिती स्थापन करत यंदाच्या शैक्षणिक वषार्साठी हा शासन आदेश मागे घेतला. यानंतर 5 जुलै रोजी दोन्ही ठाकरे बंधू तब्बल 20 वषार्नंतर एकाच मंचावर एकत्र आले. शिंदेंकडून राज ठाकरेंना धक्का मराठीसाठी एकत्र आलो आहोत असं सांगताना पुढेही एकत्र राहू असं सूचक विधान त्यावेळेस उद्धव ठाकरेंनी केलं. मात्र त्यानंतर राजकीय युतीवरुन राज ठाकरेंबरोबरच उद्धव ठाकरेंनीही कोणतीही थेट भूमिका अद्याप घेतलेली नसली तर भविष्यात हे दोन्ही भाऊ एकत्र आले तर त्याचा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर खास करुन मुंबई आणि उपनगरांमधील पालिका निवडणुकींवर परिणाम होईल असं सांगितलं जात आहे. असं असतानाच आता ठाकरे बंधुंच्या या संभाव्य युतीला तोंड देण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी कंबर कसली असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज राज ठाकरेंना एक धक्का देणार आहेत.



**मोठा पक्षप्रवेश**

मुंबईमध्ये दोन्ही ठाकरे एकत्र आले तर मराठी मतांवर परिणाम होईल अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. दोन्ही ठाकरे एकत्र आले तर सर्वात मोठा फटका एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला बसेल अशीही चर्चा दबक्या आवाजात सुरु आहे. या साऱ्या राजकीय घडामोडींदरम्यान मुंबईत एकनाथ शिंदेंनी आता राज ठाकरेंना धक्का देण्यास सुरूवात केल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. शिंदेंच्या शिवसेनेकडून मनसेच्या माजी नगरसेवकांना गळाला लावण्याचे प्रयत्न सुरु झाले असून याच मोहिमेचा पहिला भाग म्हणून आज अंधेरीत मोठा पक्षप्रवेश सोहळा होत आहे. मनसेचे पवईतील माजी नगरसेवक अविनाश सावंत हे शेकडो कार्यकर्त्यांसह आज शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आज दुपारी अंधेरीमध्ये हा पक्षप्रवेश सोहळा पार पडणार आहे.

**शिंदे काय बोलणार?**

ठाकरे बंधू राजकीयदृष्ट्याही एकत्र येण्याची शक्यता निर्माण झाल्यानंतर एकनाथ शिंदेंनी आता राज ठाकरेंच्या माजी नगरसेवकांनाही पक्षात घेण्यास सुरुवात केल्याचे दिसून येत आहे. या पक्षप्रवेश सोहळ्यामध्ये एकनाथ शिंदे कार्यकर्त्यांशी संवाद साधताना नेमकं काय बोलणार याकडेही सर्वांचं लक्ष लागून राहिलेलं आहे.

## मुंबई बॉम्बस्फोटप्रकरणी हायकोर्टाचा धक्कादायक निकाल

**■मुंबई | प्रतिनिधी :**
देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील लोकल ट्रेनच्या फर्स्टक्लास डब्यांमध्ये ११ जुलै २००६ रोजी झालेल्या साखळी बॉम्बस्फोटाचा धक्कादायक निकाल आज उच्च न्यायालयाने दिलाय. या स्फोटात २८४ जणांचा मृत्यू आणि ८०० पेक्षा अधिक जखमी झालेले होते. या प्रकरणात तपास यंत्रणांनी अटक केलेल्या ४ आरोपींना सत्र न्यायालयाने फाशीची तर उर्वरित आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. मात्र, उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाचा निकाल फिरवत सगळ्या आरोपींची निर्दोष मुक्तता केलीय. त्यापैकी बशीर खान आणि मुजम्मिल शेख हे दोन आरोपी सध्या येरवडा कारागृहात आहेत. उच्च न्यायालयाच्या या निकालाने अनेकांना धक्का




बसला असून आता एटीएसने याबाबत आपली भूमिका मांडली आहे.

हायकोर्टाच्या निकालानंतर बॉम्ब स्फोटातील आरोपींच्या सुटकेची प्रक्रिया सुरू झाली असून आदेश मिळताच पुण्यातील कारागृहात असलेल्या दोघांची सुटका केली जाईल. एकीकडे या निकालावर अनेकांनी आश्चर्य व्यक्त केलं असून ज्येष्ठ विधिज्ञ आणि खासदार उज्ज्वल निकम यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. आता, याप्रकरणी मुंबई एटीएसने सर्वोच्च न्यायालयात जाणार असल्याचे म्हटले आहे.

मुंबईतील २००६ च्या पश्चिम रेल्वे साखळी बॉम्ब स्फोट खटल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालानंतर पहिल्यांदाच एटीएस म्हणजेच महाराष्ट्र राज्य, दहशतवाद विरोधी पथकाने भूमिका मांडली आहे. ३० सप्टेंबर २०१५ रोजी मा. मोक्का विशेष न्यायालय, मुंबई यांनी निकाल दिला होता. त्यामध्ये ५ आरोपींना मृत्युदंडाची शिक्षा, तर ७ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली होती. याप्रकरणी एका आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली.

**एटीएस सुप्रीम कोर्टात जाणार**

दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाकडून सदर खटल्याचे विशेष अभियोक्ता यांच्याशी सल्लामसलत करून व निकालाच्या विश्लेषणाअंती पुढील निर्णय घेण्यात येत आहे, असे एटीएसने म्हटले आहे. एटीएस मुंबई हायकोर्टाच्या निकालाविरोधात सुप्रीम कोर्टात जाणार आहे. सुप्रीम कोर्टात जाण्यासाठी हायकोर्टाच्या निकालाचे अवलोकन करून अभ्यास करण्यात येईल. सरकारी वकिलांशी चर्चा करूनच सुप्रीम कोर्टात जाण्याची तयारी एटीएसकडून करण्यात येणार आहे.

मात्र, याप्रकरणी मृत्युदंडाच्या संदर्भाने आणि दोषी आरोपींचे अपिल उच्च न्यायालयातील न्या. किलोर आणि चांडक यांचे खंडपीठासमोर सुनावणीकरीता होते. नमुद खटल्यात ए.एस.जी. राजा ठाकरे आणि स्पेशल पी.पी. चिमलकर यांनी राज्य सरकारची बाजू मांडली. प्रस्तुत सुनावणी जुलै २०२४ पासून खंडपीठासमोर सुरू होती. त्यामध्ये अभियोग व बचाव पक्षाचे युक्तीवाद २७ जानेवारी २०२५ रोजी पूर्ण झाले होते. त्यामुळे, याप्रकरणी खटल्यामध्ये उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने आज रोजी निकाल दिला, त्यामध्ये मृत्युदंडाचे संदर्भ नाकारण्यात आले आणि दोषी आरोपींचे अपिल देखील मान्य करण्यात आले.तसेच, मोक्का विशेष न्यायालयाचा निकालही रद्द करण्यात आला आहे.

## पुण्यात भविष्य सांगण्याच्या बहाण्याने २५ वर्षीय तरुणीला एकांतात नेलं आणि...

भोंदू बाबांवर विश्वास ठेवू नका असे आवाहन अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडून वारंवार करण्यात येत असते. पण याकडे अनेकजण दुर्लक्ष करतात. याचा फायदा काही समाजकंटक उचलताना दिसतात. पुण्यातील धनकवडी परिसरात असाच एक धक्कादायक प्रकार घडलाय. एका भोंदू ज्योतिषाने भविष्य सांगण्याच्या बहाण्याने २५ वर्षीय तरुणीचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. अखिलेश लक्ष्मण राजगुरू असे या भोंदू ज्योतिषाचे नाव असून सहकारनगर पोलिसांनी त्याला तातडीने अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून अशा भोंदूबाबांविरोधात कठोर कारवाईची मागणी होतेय. कसा घडला नेमका प्रकार? सविस्तर जाणून घेऊया.



**तरुणी भोंदू बाबाकडे गेली**

फिर्यादी असलेली २५ वर्षीय तरुणी ही कायद्याचे शिक्षण घेतेय.अखिलेश राजगुरू हा ज्योतिषी पत्रिका पाहून भविष्य सांगतो, असे तिला तिच्या मैत्रिणीने सांगितले. यानंतर ती त्या भोंदू बाबाकडे गेली होती. १२ जुलै २०२५ रोजी तिने आपल्या भावाची पत्रिका या ज्योतिषाला दाखवली. पत्रिका पाहिल्यानंतर राजगुरूने तिला, ₹तुमच्या भावाला एक खास वनस्पती द्यावी लागेल, ती मागवून घेतल्यानंतर तुम्ही पुन्हा या,₹ असे सांगितले. १८ जुलै रोजी राजगुरूने फियार्दी तरुणीला वनस्पती घेण्यासाठी उद्या येण्याचे सांगितले. त्यानुसार, १९ जुलै रोजी ती धनकवडी येथील त्याच्या ''श्री स्वामी समर्थ ज्योतिष कार्यालयात'' गेली. तिथे राजगुरूने तिला, ''तुमच्या डोक्यावर ही वनस्पती ठेवून मंत्र म्हणावे लागतील,'' असे सांगितले.

**पोलिसांचे आवाहन**

अशा भोंदू ज्योतिषी आणि बाबांच्या जाळ्यात अडकू नये. कोणत्याही संशयास्पद व्यक्ती किंवा घटनेबाबत तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केलंय. तसेच अशा घटनांमुळे अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल असेही ते म्हणाले.

**अचानक मिठी मारली**

मात्र यावेळी तरुणीला त्याच्या वागण्याबाबत संशय आला आणि ती तिथून निघण्याचा प्रयत्न करू लागली. याचवेळी अखिलेश राजगुरूने अचानक तिला मिठी मारली आणि तिचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला.तरुणीने धैर्य दाखवत त्याला विरोध केला आणि तातडीने तिथून निघून आपल्या भावाला फोन करून घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर तिने सहकारनगर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे सहकारनगर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत राजगुरूच्या कार्यालयावर छापा टाकला आणि त्याला अटक केली. त्याच्याविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी भोंदू बाबाचा तपास सुरू केला. या घटनेने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झालाय.

**कोण आहे भोंदू बाबा?**

अखिलेश राजगुरू हा स्वतःला ज्योतिषी म्हणवतो आणि भोळ्या-भाबड्या लोकांचा विश्वास संपादन करतो. अशा भोंदूबाबांमुळे समाजात अंधश्रद्धा वाढत असून अशा व्यक्तींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी मागणी स्थानिकांनी केलीय. सहकारनगर पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला असून, यापूर्वीही अशा प्रकारच्या तक्रारी राजगुरूविरुद्ध आल्या होत्या का?, याची चौकशी सुरू आहे.

## नाशिकमध्ये आईच्या काळजीपायी २० वर्षीय मुलीने दिला जीव!

**■नाशिक | प्रतिनिधी :**
नाशिकमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. २० वर्षांच्या तरुणीने आत्महत्या केली आहे. आईला शिक्षणाचा फार नको म्हणून म्हणून तरुणीने चिठ्ठी लिहित आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले आहे. या प्रकरणी पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पूजा दीपक डांबरे असं या तरुणीचे नाव आबे. बिडी कामगार नगर अमृतधाम येथील ती रहिवासी आहे. पूजा नुकतीच बारावी पास झाली होती. तिने प्रथम वषार्साठी महाविद्यालयात प्रवेश घेतला होता. पूजाचे वडील विभक्त राहत असल्याने माय-लेकी एकत्र राहत होत्या. पूजाची आई या पोलिस अंमलदार आहेत. पूजाने गळफास घेत आत्महत्या केली आहे. त्यापूर्वी तिने एक चिठ्ठी लिहली आहे. या चिठ्ठीत तिने आई माज्या शिक्षणाचा त्रास घेऊ नको, असं म्हटलं आहे. आई तुला त्रास द्यायचा नाही माझा शैक्षणिक खर्च फार आहे तू टेन्शन घेऊ नकोस तुझी धावपळ होते, असा मजकूर त्या चिठ्ठीत सापडला आहे. पूजाच्या आत्महत्येने एकच खळबळ उडाली आहे. तसंच, पूजाच्या आईलादेखील मोठा धक्का बसला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करत आहेत.




दरम्यान, तीन दिवसांपूर्वी सोळा वर्षांच्या विद्यार्थिनीनी हॉस्टेलमध्ये आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. नाशिकच्या शरणपूर रोड येथील तिबेटीयन मार्केट जवळ असलेल्या एका खाजगी हॉस्टेलमध्ये राहत्या खोलीत गळफास घेत 16 वर्षीय विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ज्ञानेश्वरी शिरसागर असं आत्महत्या केलेल्या सोळा वर्षीय तरुणीचं नाव आहे. ही तरुणी मुळशी अहिल्यानगरची रहिवाशी होती गेल्या दोन महिन्यापासून ती नाशिकच्या एका खाजगी होस्टेलमध्ये राहत होती...मागील दोन महिन्यांपासून ज्ञानेश्वरी या ठिकाणी राहत होती. तीने नीटच्या परीक्षेसाठी शहरात एका खासगी क्लासमध्ये प्रवेश घेतला होता. तिच्या आत्महत्येमागील कारण समोर आलेले नाही. याबाबत अकस्मात मृत्यूची नोंद सरकारवाडा पोलिसांनी केली आहे.

## राहत्या घरात नवऱ्याची कबर खोदली आणि बॉयफ्रेंडसोबत...

**■मुंबई | प्रतिनिधी :**
मुंबईजवळ एक भयानक घटना घडली आहे. एका विवाहित महिलेने पतीची हत्या करुन त्याचा मृतदहे घरातच पुरला. नवऱ्याची हत्या करुन ही महिला तिच्या प्रियकरासह फरार झाली. या महिलेचे भयानक कृत्य पाहून पोलिसही हादरले. पोलिस या महिलेचा आणि तिच्या प्रियकराचा शोध घेत आहेत. नालासोपारा पूर्वेच्या धानीव बाग परिसरातील ओम साई वेल्फेअर चाळीत चौहान हे दाम्पत्य आपल्या आठ वर्षाच्या मुलासोबत राहत होते. मृत व्यक्तीची पत्नी गुडिया चौहान हिचे शेजारीच राहणाऱ्या एका वीस वर्षीय तरुणासोबत प्रेम संबंध होते. नवऱ्याचा काटा काढण्यासाठी गुडिया आणि तिच्या प्रियकाराने पती विजय चौहान याची राहत्या घरातच हत्या केली. एवढ्यावरच न थांबता घरातच घरातच चार फूट खड्डा खणून विजयचा मृतदेह या दोघानी घरातच पुरला. जिथे नवऱ्याला पुरले त्या जागेवर नवीन टाइल्स लावून ही हत्या लपवण्याचा प्रयत्न केला. विजय चव्हाण याचा संपर्क होत नसल्याने त्याचा भाऊ घरापर्यंत पोहोचला. त्याने चौकशी केली असता विजयबाबत काहीच माहिती मिळाली नाही. दरम्यान, त्याला घरात तीन नवीन लाद्या लावल्याचे दिसल्याने संशय आला. यामुळे त्याने पोलिसांना भावासह संपर्क होत नसल्याचे पोलिसांनां सांगितले यानंतर हे प्रकरण उघडकीस आले आहे.



सध्या मृत विजयची पत्नी गुडिया आणि तिचा प्रियकर फरार आहेत. पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. पोलिसांनी विजयचा गाडलेला मृतदेह बाहेर काढला. या मृतदेह पोस्टमार्टेमसाठी पाठवला जाणार आहे. शव विच्छेदन अहलवाता विजयच्या मृत्यूचे नेमके कारण समोर येईल. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.




## अपहरण झालेल्या दहा वर्षांच्या शाळकरी मुलाची अतिशय क्रूरपणे हत्या

**■अकोला | प्रतिनिधी :**
माढ्याच्या अरण गावातून एक अतिशय खळबळजनक बातमी समोर आली आहे. यात अपहरण झालेल्या दहा वर्षांच्या शाळकरी मुलाची अतिशय क्रूरपणे हत्या करण्यात आली आहे. दगडाने ठेचून या शाळकरी मुलाची हत्या करण्यात आली आहे. कार्तिक बळीराम खंडागळे असं हत्या झालेल्या मुलाच नाव आहे. कार्तिक हा १५ जुलै रोजी याच शाळेच्या मैदानावरून अचानक गायब झाला होता. प्राथमिक अंदाजानुसार कार्तिकचं अपहरण झालं असावा, असा अंदाज यावेळी वर्तवण्यात आला होता. दरम्यान घटनेची माहिती समजताच पोलिसांनी आणि कुटुंबियानी शोध घेतला मात्र कार्तिकचा कुठेही शोध लागला नाही.



**चार दिवसानंतर कालव्यात सापडला मृतदेह**

दरम्यान, चार दिवसानंतर अखेर कार्तिक खंडागळेचा आज मृतदेह आढळून आला आहे. कालव्यात हा मृतदेह सापडून आला असून यात अतिशय क्रूरपणे हत्या करण्यात आल्याचे समोर आले आहे. मात्र या हत्येचे नेमकं कारण काय हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. सध्या टेंभुर्णी पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहे. मात्र या घटनेने परिसरात एकाच खळबळ उडाली आहे. तर शाळकरी मुलाच्या कुटुंबियांमध्येही दहशत निर्माण झाली आहे.

**अकोल्यात सराईत गुन्हेगारांची धिंड अट्टल गुन्हेगार ढसाढसा रडले**

अकोल्यात गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी अकोला पोलिसांनी सराईत गुन्हेगारांची धिंड काढायला सुरुवात केलीय. गेल्या २ दिवसात अकोला पोलिसांनी दोन ठिकाणी टोळीने गुन्हेगारी करणाऱ्या गुन्हेगारांचा 'रोड शो' केलाय. आज अकोल्यातल्या जुने शहर पोलीस स्टेशन हद्दीत टोळीने गुन्हेगारी करणाऱ्या ३ आरोपींची धिंड काढण्यात आली.. तर परवा अकोल्यातल्या कृषी नगरात दोन गटात वाद गॅंगवॉर झाला होता. याठिकाणी काल रात्री ७ आरोपींची धिंड काढण्यात आली होतीय. कृषी नगरात वर्चस्वाच्या लढाईतून हा गॅंगवॉर झाला होता. तलवारीसह बंदुकीचा या वादात वापर झाला होता. त्यामुळे नागरिकांमध्ये मोठी दहशत पसरली होती. आता या दोन्ही गटातील प्रमुखांना आणि त्यांच्या साथीदारांची कृषी नगर परिसरात धिंड करण्यात आली होती. तर आज जुने शहरात तीन गुंडांची धिंड काढण्यात आलीय. अकोला शहरातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आणणारे या गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी हा 'रोड शो' होताय.. त्यामुळे या गुन्हेगारांना अकोला पोलिसांनी चांगला धडा शिकवला.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# भारताला सावध राहावे लागेल...

**अमेरिकेच्या निर्णयानंतर अन्य देशही ह्यटीआरएफह्ला आंतरराष्ट्रीय दहशतवादी जाहीर करू शकतात. संयुक्त राष्ट्रांनीही तसा निर्णय घ्यावा, यासाठी भारत आग्रह करू शकतो. चीनने अमेरिकेच्या भूमिकेने समर्थन करताना दहशतवादाच्या विरोधातील लढण्यासाठी मदतीचा हात पुढे केला आहे.**

पहलगाम हल्ला घडवून आणणाऱ्या 'द रेझिस्टन्स फ्रंट' (टीआरएफ) या पाकिस्तानस्थित 'लष्कर-ए-तैयबा'चा दहशतवादी संघटनेचा एक भाग असलेल्या संघटनेला 'आंतरराष्ट्रीय दहशतवादी' जाहीर करण्याचा अमेरिकेचा निर्णय हे भारताच्या कूटनीतीचे यश म्हणावे लागेल. पहलगामचा कट पाकिस्तानातच शिजला आणि त्याच्या मदतीनेच तो पार पडला, हे भारताचे म्हणणेही यामुळे उचलून धरले गेले. दहशतवादाच्या विरोधातील लढ्यात आपणही सहभागी असल्याचा दावा करून पाकिस्तानने साळसूदपणाचा आव आणला असला, तरी या निर्णयाद्वारे अमेरिकेने त्याला इशारा दिला आहे. 'टीआरएफ'वर 'आंतरराष्ट्रीय दहशतवादी' असा शिक्का अमेरिकेने मारल्यानंतर या संघटनेला केली जाणारी आर्थिक आणि अन्य प्रकारची मदत हे गुन्हेगारी कृत्य ठरते; त्यामुळे आता कोणाला 'टीआरएफ'ला मदत करता येणार नाही. यामुळे पाकिस्तानला उघडपणे 'टीआरएफ'ला आश्रय देता येणार नाही. अर्थात, दहशतवाद्यांना लपवून त्यांना मदत करण्याचे तंत्र पाकिस्तानला चांगलेच अवगत आहे. त्यामुळेच 'टीआरएफ'वर बंदी आली असली, तरी देशातील दहशतवादी हल्ले थांबतील, असे नाही. म्हणूनच सुरक्षा व्यवस्थेतही ढिलेपणा राहून चालणार नाही. भारताच्या विरोधात दहशतवाद्यांकडून छुपे युद्ध पाकिस्तानने सुरू केले त्याला आता तीन दशकांहून अधिक काळ लोटला आहे. 'लष्कर-ए-तैयबा' (एलईटी), 'जैश-ए-महंमद' (जेईएम), 'हिज्बुल मुजाहिदीन' अशा अनेक दहशतवादी संघटनांचे तळ पाकिस्तानात असून, त्यांना तेथील सरकार आणि लष्कर मदत करीत असतात. भारतात मोठा दहशतवादी हल्ला घडल्यानंतर जगभरातून पडसाद उमटल्यावर काही काळ कारवाया थंड होतात. दहशतवादी संघटनांवर बंदीही घातली जाते. मात्र, कालांतराने वेगळ्या नावाने या संघटना हल्ले करतात. 'एलईटी', 'जेईएम' आदींवर बंदी घातली गेली; परंतु त्या वेगळ्या नावाने सक्रिय आहेत. पहलगाम हल्ला घडवून आणणारी 'टीआरएफ' ही 'एलईटी'चाच एक भाग असलेली संघटना. पहलगाममध्ये २६ निरपराधांच्या हत्येनंतर तिने हल्ल्याची जबाबदारीही घेतली. पाकिस्तान सरकारने हात झटकण्याचा प्रयत्न केला. मात्र, या हल्ल्यातील तिन्ही दहशतवादी पाकिस्तानी असल्याचे तपासातून स्पष्ट झाले आहे. अशा हल्ल्यांना चोख प्रत्युत्तर देण्याची भाषा करून भारताने पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर क्षेपणास्त्र हल्ले केले. भारताच्या कारवाईला पाकिस्तानने उत्तर देण्याचा प्रयत्न केला असला, तरी झालेले नुकसान पाहून युद्ध थांबविण्यासाठी विनवणीही केली. मात्र, यानंतरही पाकिस्तानच्या भूमिकेत मोठा बदल झाला नाही. इस्रायल-इराण युद्धामुळे अमेरिकेला आपली गरज लागणार हे ओळखून पाकिस्तानने पावले उचलली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही भारत-पाकिस्तान युद्ध आपणच थांबविल्याचा धोशा लावला. शिवाय पाकिस्तानच्या लष्करप्रमुखांचे त्यांनी वॉशिंग्टनमध्ये आदरातिथ्यही केले. यामुळे अमेरिकेला आपल्या बाजूने वळविण्यात यश येत असल्याची भावना पाकिस्तानात तयार होत होती. 'टीआरएफ'वरील कारवाईच्या निर्णयामुळे पाकिस्तानला वास्तवाचे भान येऊ शकेल. मात्र, त्यामुळे त्याच्या वर्तनात बदल होण्याची शक्यता नाही. 'टीआरएफ' ही 'एलईटी' किंवा 'जेईएम' यांच्यासारखी जगभर कारवाया करणारी दहशतवादी संघटना नाही. तिच्या कारवाया प्रामुख्याने जम्मू-काश्मीरपुरत्या मर्यादित आहेत. दहशतवादी कारवायांमुळे आर्थिक कारवाई कृतीगटाने पाकिस्तानला करड्या यादीत टाकल्यानंतर 'एलईटी'मधील दहशतवादी 'टीआरएफ'च्या नावाने काश्मीरमध्ये कारवाया करू लागले. गेल्या पाच वर्षांत या संघटनेच्या कारवाया वाढत गेल्या. आता तिच्यावर बंदी आल्याने तेथील दहशतवादी वेगळ्या नावाने पुन्हा संघटित होण्याचा धोका कायम आहे. आजवरचा अनुभव पाहता, असे होण्याची शक्यता अधिक. त्यामुळे दहशतवादी कारवाया रोखण्यासाठी सज्ज राहतानाच पाकिस्तानला जगासमोर उघडे पाडण्याचे धोरण असेच चालू ठेवावे लागेल. आपल्या भू-राजकीय स्थानाचा लाभ घेऊन अमेरिकेसाठी अनुकूल भूमिका बजावल्याची किंमत पाकिस्तान भारतविरोधी कारवायांद्वारे वसूल करीत आला आहे. अफगाणिस्तानातून अमेरिका बाहेर पडल्यावर त्याची उपयुक्तता कमी झाली होती. शिवाय आर्थिक परिस्थितीमुळे तो अडचणीतही आला होता. आता या परिस्थितीत किंचित सुधारणा होऊ लागल्यावर पाकिस्तान आक्रमक होत आहे.

# तंत्रज्ञानाधारित परिवर्तनाची ११ वर्षे




प्राचीन भारतातील महाभारत या महाकाव्यात महर्षी व्यास म्हणतात की, ज्ञान हे सर्वात मोठे सामर्थ्य आहे. अकरा वर्षांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली. त्यावेळी त्यांनी भारताला केवळ ग्राहकच नव्हे, तर जागतिक विज्ञानाचा उत्पादक बनवण्याचा आधुनिक संकल्प सोडला. त्यामुळे या शाश्वत सत्याचे पुनरुज्जीवन झाले. आज मागे वळून पाहताना, कोणीही खात्रीने म्हणू शकतो की, तंत्रज्ञानावर आधारित ११ वर्षांमधील परिवर्तन भारताच्या भविष्यातील प्रगतीची चाहूल देत आहे आणि आता या परिवर्तनकारी प्रवासाला एक दशकाहून अधिक काळ लोटला असून, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग (डीएसटी) त्या दृष्टिकोनाची साक्ष देत आहे, जिथे प्रयोगशाळा लाँचपॅड बनल्या आहेत आणि नवोन्मेष हा राष्ट्रीय विकासाचा नवा परवलीचा शब्द बनला आहे.

जेव्हा मी विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचा मंत्री म्हणून पदभार स्वीकारला, तेव्हा मला वारशासारखा केवळ एक विभाग मिळाला नाही, तर एक आश्वासन देखील मिळाले-विज्ञान सर्वांपर्यंत पोहोचविणे, नवोन्मेषाचे विकेंद्रीकरण करणे आणि त्याचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे आश्वासनही मी दिले होते.

२०१४ साली भारताची वैज्ञानिक परिसंस्था ऊर्जामय होती, पण विखुरलेली होती; महत्त्वाकांक्षी होती, पण तिथे साधनसंपत्तीची कमतरता होती. संशोधन बहुतेकदा उच्चभ्रू संस्थांपुरते मर्यादित होते आणि सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात वैज्ञानिक प्रगतीचा आत्मा क्वचितच गवसत असे. असा संदर्भ होता. त्यानंतर राष्ट्रउभारणीत विज्ञानाची भूमिका नव्याने मांडण्याचा जाणीवपूर्वक, संतुलित आणि धाडसी प्रयत्न झाला.

परिवर्तनाची सुरुवात सोपी, मात्र आमूलाग्र बदल : स्वतःच्या प्रतिभेवरील विश्वासामुळे बदल घडला. २०२३ मधील अनुसंधान नॅशनल रिसर्च फाऊंडेशनची (एएनआरएफ) स्थापना ही एक महत्त्वाची घटना होती. भारताने प्रथमच धोरणात्मक दृष्टिकोनासह संशोधन आणि विकास परिसंस्था चालवण्यासाठी एक वैधानिक संस्था स्थापन केली.'प्रधानमंत्री अर्ली करिअर रिसर्च ग्रँट'च्या माध्यमातून ६,९००हून अधिक युवा शास्त्रज्ञांना सक्षम बनवण्यासाठी आणि समावेशक संशोधन अनुदानांतर्गत १,७५४ अनुसूचित जाती/ जमाती समुदायाच्या संशोधकांना सहाय्य करून, वैज्ञानिक उत्कृष्टता ही काही मोजक्या लोकांची मक्तेदारी नसून, अनेक जणांच्या प्रतिभेचा शोध घेणे आहे, याची आम्ही खात्री दिली आहे. पण आम्ही लोकांना अनुदान देऊन थांबलो नाही, तर आम्ही संस्था निर्माण केल्या. आयआयटी आणि आयआयएससी येथे चार थीमॅटिक केंद्रे असलेले राष्ट्रीय क्वांटम मिशन, क्वांटम कॉम्प्युटिंग, कम्युनिकेशन आणि सेन्सिंगमध्ये भारताला आघाडीवर ठेवत आहे. राष्ट्रीय सुपर कॉम्प्युटिंग मिशनने देशभरात आधीच २८ उच्च-कार्यक्षमता असलेल्या कार्यप्रणाली तैनात केल्या आहेत, ज्यामुळे पुराच्या भाकितापासून ते औषधांच्या शोधापर्यंत प्रत्येक क्षेत्रात यश मिळाले आहे. ही केवळ यंत्रे नाहीत, तर नव्या भारताची साधने आहेत.

तथापि, वैज्ञानिक प्रगतीचा खरा मापदंड केवळ पेटाफ्लॉप अथवा पेटंटमध्ये नसून, त्याद्वारे प्रभावित झालेल्या जीवनात आहे. आयआयटी मुंबई येथे विकसित केलेल्या स्मार्ट कृषी केंद्राचेच पाहा ना, जे दुर्गम भागातील शेतकऱ्यांना मृदा आणि हवामानाच्या स्थितीची तत्काळ माहिती घेण्यासाठी सक्षम बनवते, आयआयटी भिलाईचे दिव्यांग एटीएम, जे अंध व्यक्तींना सन्मानाने बँकिंग सेवांचा लाभ घेण्यासाठी सक्षम बनवते किंवा ४६ वुमन टेक्नॉलॉजी पार्क्स, ज्यांनी ११,००० हून अधिक महिलांना वैज्ञानिक व्यवसायांचे प्रशिक्षण दिले असून, गृहिणींना उद्योजक बनवले आहे. हे सर्व सक्षम समाजाचा पाया आहेत.

आपल्या काळातील सर्वात गंभीर आव्हानांपैकी एक असलेला हवामान बदल- भारतीय विज्ञान हा याचा एक दृढ सहयोगी आहे. हवामान बदलावरील राष्ट्रीय मोहिमांच्या माध्यमातून, आपण २९ राज्यांमध्ये हवामान बदल केंद्रे स्थापन केली आहेत आणि २,००० हून अधिक संशोधनपत्रे आणि १,००० अहवालांमध्ये योगदान दिले आहे. हिमालयातील हिमनद्यांचे मॅपिंग करण्यापासून ते १.८ लाखांहून अधिक लाभधारकांना प्रशिक्षण देण्यापर्यंत, आपण केवळ हवामान बदलाचा अभ्यास करत नाही, तर भारताला परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी, प्रतिसाद देण्यासाठी आणि नेतृत्व करण्यासाठी सज्ज देखील करत आहोत.

मनुष्यबळामधील आपली गुंतवणूकही तेवढीच परिवर्तनकारी ठरली आहे. इन्स्पायर कार्यक्रमाने विद्यापीठांमधील ७५,००० हून अधिक विद्यार्थी आणि ६,८०० डॉक्टरेट करणाऱ्या संशोधकांना पाठबळ दिले आहे, तर मानक योजनेने २.५ लाखांहून अधिक शालेय स्तरावरील नवोन्मेषाला राष्ट्रीय व्यासपीठ मिळवून दिले आहे. आपण विज्ञानाच्या मदतीने भूगोलाचीही नव्याने व्याख्या बनवली आहे. एकेकाळी दुर्लक्षित समजला जाणारा ईशान्य भाग आता केशराची लागवड आणि ड्रोन-आधारित भू-स्थानिक मॅपिंगचे केंद्र बनला आहे. नेक्टर आणि भारतीय सर्वेक्षण विभागाच्या प्रयत्नांमुळे, दोन लाखांहून अधिक गावांचे १० सेमी रिझोल्यूशनसह मॅपिंग करण्यात आले आहे. ज्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये जमिनीवरील कायदेशीर अधिकाराची आणि सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

या आकड्यांमागे एक मोठी कथा आहे. श्रद्धा, प्रतिभा आणि चिकाटीची कहाणी आहे. आपल्या शास्त्रज्ञांवरचा विश्वास आहे, तरुणांमधील प्रतिभा आहे आणि आपल्या धोरणांमधील दृढता आहे. २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेला एक लाख कोटी रुपयांचा संशोधन, विकास आणि नवोन्मेष (आरडीआय) निधी ही केवळ आर्थिक वचनबद्धता नसून, उद्दिष्टांची घोषणा आहे. आम्ही खासगी क्षेत्राला भारताच्या वैज्ञानिक भवितव्याचे सहलेखन करण्यासाठी आमंत्रित करीत आहोत. भविष्याकडे पाहताना, पुढचा मार्ग आव्हानात्मक आणि रोमांचक असल्याचे दिसून येत आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, रोबोटिक्स आणि स्पेस सायन्ससारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानासाठी केवळ गुंतवणुकीची नव्हे, तर कल्पनाशक्तीची देखील आवश्यकता असेल. शेवटी, विज्ञान म्हणजे केवळ समस्यांवर उपाय शोधणे नसून, शक्यतांचा विस्तार करणे आहे. समाजाचा सर्वात अंधःकारमय कोपरा उजळून टाकणे आणि करुणा व धैर्याने प्रेरित ज्ञान कोणत्याही राष्ट्रामध्ये खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवू शकते हे सिद्ध करणे, हे यामागील उद्दिष्ट आहे.

आता, जेव्हा आपण मोदी सरकारच्या ११ वर्षांच्या कारकीर्दीची यशोगाथा सांगत आहोत, तेव्हा मला पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी काय म्हणतात ते आठवतेः हे केवळ एक सरकार नाही, तर एक चळवळ आहे- भारताला स्वावलंबी, जगभरात आदरणीय आणि मानवतावादी बनवण्याची चळवळ आणि त्या चळवळीत विज्ञान हा केवळ प्रेक्षक नाही, तर तो अग्रदूत आहे. चला, स्वप्ने पाहूया, नवे शोध लावूया आणि स्वप्ने साकारूया. कारण लोकशाहीच्या प्रयोगशाळेत विज्ञानाचा प्रत्येक प्रयोग हा आशेचा प्रयोग असतो.

## सल्ला आत्मसंयमाचा!

स्वातंत्र्य आणि जबाबदारी यात गल्लत न करण्याची सूचना सर्वोच्च न्यायालयाकडून आली आहे. समाजमाध्यमे म्हणजे आजच्या काळातील जवळपास सगळ्यांनाच उपलब्ध असलेले साधन. हे साधन सध्या अनिर्बंध विचारांचे मुक्तपीठ बनले आहे, असे दिसते. या समाजमाध्यमांवर मुद्द्यांचे विचारशील आदानप्रदान न होता अनेकदा वैचारिक तंट्याची स्थिती उद्भवते. सजग नागरिकांच्या निकषात कर्तव्याचे विस्मरण अपेक्षित नसते. समाजभान हा मुद्दा महत्त्वाचा असतो. आपल्या कृतीतून सामाजिक हानी होणार नाही, याची दक्षता घेत विवेकशील आचरणाला प्राधान्य दिले तर कलह टाळणे शक्य आहे, तसे दिसत मात्र नाही. समाजमाध्यमांवरील आक्षेपार्हता टाळण्यासाठी नागरिकांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्य ाचे मोल जाणून घेत आत्मसंयम बाळगावा, अशी अपेक्षा व्यक्त करून स्वयंनियमनातून अनेक समस्या टळतील, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. कोलकात्यातील वजाहत खान यांनी समाजमाध्यमांवर आक्षेपार्ह मजकूर टाकल्याने त्याविरोधात अनेक राज्यांत एफआयआर नोंदविण्यात आले. त्या सर्वांचे एकत्रीकरण करण्यासाठी याचिका दाखल करण्यात आली होती. भारतीय नागरिकाला भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य या मूलभूत अधिकारांचा उपयोग करता येईल, मात्र आवश्यक निर्बंध हवेतच. आत्मसंयम आणि नियंत्रणातून ही अभिव्यक्ती अधिक मोलाची ठरेल, असे न्यायालयाने नमूद केले. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीही अभिव्यक्तीचा आदर केला आहे. एखाद्या व्यक्तीकडून वा समूहाकडून मुक्त विचार मांडले जाणे हा निरोगी नागरी समाजाचा मूलभूत गाभा आहे. त्यामुळे अभिव्यक्ती नसल्यास राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ने सांगितलेली सन्मानपूर्वक जीवनपद्धती नागरिकांना मिळणार नाही. सुदृढ लोकशाहीमध्ये व्यक्ती वा समूहाने व्यक्त केलेल्या भावनांचा केवळ विचारांनीच प्रतिवाद होऊ शकतो, असे मत काँग्रेसचे खासदार इम्रान प्रतापगढी यांच्याविरोधातील एफआयआर रद्द करताना सर्वोच्च न्यायालयाने साधारणतः चार महिन्यांपूर्वीच व्यक्त केले होते.

# १९ देशांच्या एकजुटीने चीनला धडकी



**महासत्तेसाठी आसुसलेल्या चीनला जबर धडकी भरली आहे. संपूर्ण दक्षिण चिनी समुद्रावर आपलाच हक्क आहे, असे चीनचे वर्तन आहे. तब्बल १९ देशांचे ४० हजार सैनिक सशस्त्र मैदानात उतरले आहेत. भारतही यात सहभागी झाला असून जगात पहिल्यांदाच असा प्रकार घडत आहे.**

ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज हे सध्या चीन दौऱ्यावर आहेत. चीनचे सर्वेसर्वा शी जिनपिंग यांची भेट घेऊन त्यांनी ऑस्ट्रेलिया-चीन संबंध आणि व्यापार बळकट करण्याबाबत चर्चा केली. त्याचवेळी तिकडे दक्षिण चीन समुद्रात ऑस्ट्रेलियाच्याच पुढाकाराने तब्बल १९ देशांचे लष्करी पथक सराव करीत आहे. सुमारे ४० हजार सैनिक सशस्त्र सज्ज आहेत. तसे पाहता हा काही योगायोग नाही, तर मुत्सद्देगिरी आणि डावपेचांचा एक भाग आहे. याद्वारे ऑस्ट्रेलियन पंतप्रधानांनी चीनला अनेक इशारे दिले आहेत. सर्वप्रथम दक्षिण चीन समुद्रात नेमके काय घडते आहे ते जाणून घेऊ.

आजवरच्या इतिहासातील सर्वात मोठा युद्ध सराव होत आहे. 'तॅलिस्मन सेबर' असे त्याला नाव देण्यात आले आहे. 'तॅलिस्मन सेबर'चा अर्थ आहे जादुई तलवार. म्हणजेच ही जादुई शक्ती चीनच्या पोटात गोळाच आणणारी आहे. गेल्या काही दशकात चीनने दक्षिण समुद्रात जणू मनमानी सुरू केली आहे. त्यामुळे या परिसरातील लहान-मोठ्या देशांमध्ये भीतीचे वातावरण आहे. संपूर्ण दक्षिण चिनी समुद्रावर आपलाच हक्क आहे, असे चीनचे वर्तन आहे. त्याच्या युद्धनौका, लढाऊ विमाने, पाणबुड्या, हेरगिरी आदींचा ससेमिरा तेथे सुरू आहे. त्याला शह देण्यासाठीच या महाकाय युद्ध सरावाचा डाव टाकण्यात आला आहे. इंडो-पॅसिफिक समुद्रात चीनने आक्रमक कारवाया सुरू ठेवल्या तर त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी मजबूत, एकजूट आणि तांत्रिकदृष्ट्या धारदार एकजूट तयार होत असल्याचा संदेश चीनला या सरावाने दिला आहे.

ऑस्ट्रेलिया आणि पापुआ न्यूगिनी यांच्या आसपासच्या समुद्रात 'तॅलिस्मन सेबर २०२५' या युद्ध सरावाचे आयोजन करण्यात आले आहे. भल्या भल्या देशांना धडकी भरावी, असा हा महाकाय सराव आहे. 'तॅलिस्मन सेबर' हा सराव २००५ मध्ये सुरू झाला. अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया या दोन देशांद्वारे वर्षातून दोनदा केला जातो; मात्र, यंदा या सरावात तब्बल १७ देशांना सहभागी करून घेण्यात आले आहे. त्यात भारताचाही समावेश आहे. नेहमी हा सराव ऑस्ट्रेलियात होतो. यंदा प्रथमच तो ऑस्ट्रेलियाबाहेर पापुआ न्यूगिनीमध्ये होत आहे. क्वीन्सलँड येथे अत्याधुनिक शस्त्रास्त्रांसह ४० हजार सैनिकांची फौज जमली आहे.

कोरल समुद्र आणि नैऋत्य पॅसिफिक प्रदेशात चीनचा हस्तक्षेप सातत्याने वाढत आहे. म्हणूनच भारत, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान आणि आग्नेय आशियापासून दक्षिण पॅसिफिकपर्यंतचे बेट असलेले देश या युद्ध सरावात सहभागी झाले आहेत. 'नियमांवर आधारित सागरी व्यवस्था आणि सार्वभौमत्वाचे रक्षण करणे' हा प्रमुख संदेश सरावामागे आहे. चीन अनेकदा येथील लहान देश आणि बेटांवर दावा करतो. दक्षिण चीन समुद्रातील फिलिपिन्स, व्हिएतनाम, मलेशिया, ब्रुनेई, सोलोमन बेटे, पापुआ न्यूगिनीसारख्या छोट्या देशांवर चीन नेहमीच डोळे वटारतो. विस्तारवादासाठी चीनला हे देश हवे आहेत. परंतु, 'तॅलिस्मन सेबर २०२५' या युद्ध सरावाने चीनच्या महत्त्वाकांक्षांना नक्कीच वेसण बसणार आहे.

पहिल्यांदाच चीनच्या विरोधात १९ देश एकत्र आले आहेत आणि त्याच्या भूमीलगत ४० हजार सैनिक युद्ध सराव करीत आहेत. या सरावात अनेक महत्त्वाच्या बाबी घडत आहेत. जसे की, ऑस्ट्रेलियाने प्रथमच 'हिमारस' या ४०० किलोमीटर अंतरावरील अचूक लक्ष्य भेदणाऱ्या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली. जपानने जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या 'टाइप ३' या मध्यम श्रेणीची क्षेपणास्त्रे डागली. दक्षिण कोरियाने 'के-१' रणगाडा आणि 'के९ए२' या स्व-चलित हॉवित्झर तोफेचे प्रात्यक्षिक केले. अमेरिकन एफ३५बी लढाऊ विमानेही सहभागी झाली. हा सराव केवळ दिखावा नाही तर तो एकजुटीची सुरुवात आहे. तसेच वेळेप्रसंगी हे देश चीनविरुद्ध एकत्र येऊ शकतात. चीनविरुद्ध लढाईही करू शकतात, असा इशारा चीनला मिळत आहे. भारतातील ऑस्ट्रेलियन राजदूत फिलिप ग्रीन म्हणाले की, 'भारत पहिल्यांदाच 'तॅलिस्मन सेबर २०२५' युद्ध सरावात सहभागी होत आहे. हे अभिमानास्पद आहे. इंडो-पॅसिफिकमधील संरक्षण आणि सुरक्षेच्या दृष्टीने हे एक अतिशय महत्त्वाचे पाऊल आहे.' तिबेटनंतर तैवानचा घास घेऊ पाहणाऱ्या चीनला या महाकाय युद्ध सरावाने नक्कीच घाम फोडला आहे.

खास म्हणजे, युद्ध सराव सुरू झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी ऑस्ट्रेलियन पंतप्रधान चीन दौऱ्यावर गेले आणि त्यांनी चिनी राष्ट्राध्यक्षांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी जिनपिंग यांच्या डोळ्याला डोळा भिडवून अनेक संदेश दिले आहेत. चीनच्या कुटील कारवायांविरोधात इंडो पॅसिफिक देश गप्प बसणार नाहीत, वेळेप्रसंगी ते तोडीस तोड उत्तर देतील, चीनने महत्त्वाकांक्षांना आवर घालावा, इंडो-पॅसिफिक प्रदेश केवळ एका देशाचा नाही तर तो सर्वांचा आहे, चीनने वर्चस्व गाजवण्यापूर्वी येथील देशांची ताकद पहावी आदींचा त्यात समावेश आहे. अल्बानीज यांचे धाडस खरोखरच वाखाणण्यासारखे आहे. कारण, संरक्षण, व्यापार, उत्पादन, तंत्रज्ञान आदी क्षेत्रात बलाढ्य बनलेल्या चीनला कुणीही अंगावर घेण्यास तयार नाही. तसेच, त्याला धडकी भरविण्याची क्षमता अमेरिका आणि रशिया सोडून कुणाकडेच नाही. अशा परिस्थितीत १९ देशांनी चीनच्या दहशतीला लगाम घालण्यासाठी एकत्र येऊन एक नवा पायंडा पाडला आहे. चीनने आपल्या शेजारील देशांशी सलोख्याचे संबंध ठेवणे आवश्यक आहे. अन्यथा हे सर्व देश एकत्र येऊन सामूहिक ताकदीने चीनला धडा शिकवू शकतात. चीनने इंडो पॅसिफिक प्रदेशातील कृत्रिम बेटांवर लष्करी तळ बांधले आहेत. हा महाकाय युद्ध सराव त्या तळांना नष्ट करण्याच्या शक्तीचे प्रदर्शन देखील समजला जातो आहे. युद्ध सरावात सहभागी झालेले ब्रिगेडियर विल्सन म्हणाले की, 'हा सराव कोणत्याही विशिष्ट देशाविरुद्ध नाही, तर चीन त्याला स्वतःविरुद्ध एक धोरणात्मक संकेत म्हणून पाहत असेल.'

सध्या चीनमध्ये शांघाय शिखर संघटनेच्या (एससीओ) सदस्य देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची परिषद होत आहे. याच परिषदेदरम्यान 'तॅलिस्मन सेबर २०२५' हा महाकाय युद्ध सराव व्हावा हा काही योगायोग नाही. २०हून अधिक देशांचे परराष्ट्र मंत्री चीनमध्ये जमले आहेत. युद्ध सरावाने चीनची झोप तर उडावीच, शिवाय त्याच्या परराष्ट्र धोरणात योग्य तो बदल होणे अपेक्षित आहे. चीनमधील देशोदेशीच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या समोर महाकाय युद्ध सरावाची वार्ता धडकत आहे. एससीओच्या संरक्षण मंत्र्यांची परिषद गेल्या महिन्यात झाली, तर पुढील महिन्यात सदस्य देशांच्या प्रमुखांची परिषद होणार आहे.

ऑस्ट्रेलियाने २०२२ मध्ये १७ देशांचा सहभाग असलेला युद्ध सराव करून चीनला वठणीवर आणण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आता १९ देश एकजुटीने युद्ध सरावात विविध प्रात्यक्षिके करीत आहेत. यातून लष्करी अधिकाऱ्यांमधील समन्वय, वैचारिक देवाणघेवाण, कार्यपद्धती, युद्धात खेळायचे डावपेच, रणनीती आदींबाबत अत्यंत महत्त्वपूर्ण प्रकाश टाकला जात आहे. वेळेप्रसंगी एवढे देश एकत्र येऊ शकतात हा सुद्धा आदर्श यानिमित्ताने निर्माण झाला आहे.

'एकीचे बळ, मिळते फळ' या उक्तीनुसार कार्यवाही केली तर त्याचा नक्कीच फायदा होतो, हे सुद्धा स्पष्ट होत आहे. अर्थात युद्ध सरावाच्या चालीला चीन कुठल्या डावपेचांनी उत्तर देतो ते येत्या काळातच स्पष्ट होणार आहे. तूर्त तरी चीनला धडकी भरवतानाच या युद्ध सरावाने जगाचे लक्ष वेधून घेतले आहे, हे मात्र नक्की.

# 'प्रकाशगडा'च्या तोफा



उद्योगांना स्वस्तात वीज उपलब्ध करून देण्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घोषणेमुळे राज्यात नवे उद्योग येण्याचा मार्ग प्रशस्त होऊ शकतो; तसेच सध्याच्या उद्योगांची वीजदरांबाबतची तक्रारही काही प्रमाणात दूर होऊ शकेल. त्यामुळे ही घोषणा उद्योग क्षेत्राला सुखावणारी म्हणता येईल. मात्र, या घोषणेचे स्वागत करतानाच सध्याचे औद्योगिक वीजदर, नियामक आयोगाचा ताजा आदेश आणि ही कपात किती काळात होणार, याचा नेमका ताळमेळ घालण्याची आवश्यकता आहे. अपारंपरिक ऊर्जास्रोतांमधून अधिकाधिक वीजनिर्मिती, 'टेरिफ टू अप' पद्धतीमुळे दर स्थिर राहण्याची शाश्वती; तसेच दीर्घ मुदतीचे करार आणि खरेदी यांतील सूत्रानुसार कमीतकमी बोजा पडून सरकारी कंपन्यांकडून होणारी वीजखरेदी किफायतशीर ठरू शकते आणि त्यातून मिळणारे अंतिम लाभ वीजग्राहकांना होऊन दर कमी होऊ शकतात, राज्यात सध्या उद्योगांसाठी प्रतियुनिट ८.३२ रुपये दराने वीज मिळते; हा दर ७.३८ रुपये इतका कमी होईल, तेव्हा तमिळनाडू (९.०४ रुपये) आणि गुजरात (८.९८ रुपये) यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील वीज सर्वांत स्वस्त होईल, असा फडणवीस यांचा दावा आहे; परंतु ही माहिती आणि राज्यातील वीजदरांबाबत वीज नियामक आयोगाने दिलेला आदेश यांत तफावत दिसते. या आदेशानुसार राज्यात सध्या औद्योगिक वीजदर ९.४२ रुपये असून, तो ७.४५ रुपयांपर्यंत येण्यास पाच वर्षांचा कालावधी लागणार आहे. गेल्या काही महिन्यांतील याबाबतच्या दाव्या-प्रतिदाव्यांमुळे मोठा संभ्रम निर्माण झाला होता. 'इतिहासात प्रथमच वीजदर कमी झाले,' असा मोठा गाजावाजा सत्ताधाऱ्यांकडून करण्यात आला. प्रत्यक्षात आयोगाने वीजदरांबाबतचा आदेश दिल्यानंतर, त्यातील खर्चमंजुरीच्या मुद्द्यावरून तोट्यात जाण्याची भीती व्यक्त करून 'महावितरण'ने फेरविचार याचिका दाखल केली. त्यावरील सुनावणी गुपचूप पार पडल्याने आयोगावरही अपारदर्शक कारभाराची टीका झाली. या पार्श्वभूमीवर संबंधितांनी संभ्रम दूर करणे आवश्यक आहे. शेजारील राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातले वीजदर सर्वाधिक असल्याची उद्योगांची जुनी तक्रार आहे, त्याबाबत उलटसुलट दावे असले, तरी उद्योगांवरील वीजदरांचा बोजा मोठा आहे. यामुळे उद्योगांचे इतर राज्यांत स्थलांतर करण्याचेही इशारे वारंवार देण्यात येतात. पूर्वीपासून राज्यात वीजदर निश्चितीमध्ये 'क्रॉस सबसिडी' तत्त्वाचा अवलंब केला जातो. शेतकरी आणि सर्वसामान्यांना स्वस्त दरांत वीज देऊन हा भार प्रामुख्याने औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांकडून वसूल करण्यात येतो, त्यामुळे उद्योगांना चढ्या दराने वीजखरेदी करावी लागते. परिणामी उत्पादन खर्चात वाढ होते आणि त्यांना स्पर्धेत टिकाव धरणे अवघड होते, असे हे दुष्टचक्र आहे. दुसरीकडे वीजपुरवठा क्षेत्र खुले झाल्याने अनेक कंपन्या उत्सुक आहेत. 'महावितरण'ने मुंबईमध्ये, तर काही खासगी कंपन्यांनी अन्य शहरांमध्ये वीजपुरवठ्याचे परवाने मागितले आहेत. त्यामुळे आज ना उद्या हे क्षेत्र खुले होणार, हे लक्षात घेऊनच भविष्यातील नियोजन केले पाहिजे. वीजपुरवठ्यासाठी स्पर्धा आल्यावर औद्योगिक ग्राहक तुलनेने स्वस्त खासगी कंपन्यांकडे वळणे 'महावितरण'ला आणि राज्यालाही परवडणारे नाही. या स्पर्धेत टिकणे, हीसुद्धा सरकारी कंपन्यांची गरज आहे. जादा पैसे मोजून सर्वसामान्य ग्राहकांना मिळणाऱ्या सवलतींचा भार सोसणारे औद्योगिक ग्राहक गमावले, तर 'क्रॉस सबसिडी' वर आधारित असलेला हा डोलारा कोसळून पडेल आणि त्याचा फटका सामान्यांना बसेल, हे लक्षात घेऊन उद्योगांच्या वीजदरांबाबतची कसरत आणखी कौशल्याने करण्याची गरज आहे. गेल्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्र वीजपुरवठ्याबाबतच्या चक्रव्यूहात सापडला होता. 'एन्रॉन' कंपनी वाद होऊन बंद पडली; मात्र त्याचा धसका घेऊन पुढील काही वर्षे महाराष्ट्रातील नवी वीजनिर्मिती जवळपास ठप्प झाली. उद्योगधंद्याच्या आघाडीवर गती घेण्याच्या काळातच विजेचा तुटवडा आणि भारनियमनासारखी संकटे घोंगावू लागली. त्यानंतर मात्र नवा वीज कायदा, वीज नियामक आयोगाची स्थापना, वीज मंडळाचे त्रिभाजन व कंपनीकरण आणि वीजनिर्मितीला चालना अशी प्रगतिशील पावले उचलण्यात आली. तसेच 'पॉवर एक्सचेंज'द्वारे देशात कोठूनही वीजखरेदी करणे सुलभ झाले. त्यात सौरऊर्जा आणि पवनऊर्जा या स्रोतांवर भर दिल्याने विजेची उपलब्धता ही मोठी अडचण राहिलेली नाही. आता खेडोपाडी वीजपुरवठा, वीजबिल वसुलीतील अडचणी, तोट्याचा डोंगर आणि ग्राहकसेवा या आघाड्यांवर सुधारणांचे आव्हान मुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्री या नात्याने फडणवीस यांच्यासमोर आहे. उद्योगांना वाजवी दरात वीज मिळणे राज्याच्या एकूण प्रगतीसाठी आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन त्यांना खरा दिलासा लवकर दिला पाहिजे.

# किडनी स्टोन तयार होण्याची लक्षणे, उपचार जाणून घ्या





किडनी स्टोनची समस्या भारतात खूप सामान्य आहे, ही समस्या 25-45 वर्षे वयोगटात सर्वाधिक दिसून आली आहे. संशोधकांना असे आढळून आले की महिलांच्या तुलनेत पुरुषांमध्ये हा धोका तिप्पट आहे. भारतात दरवर्षी सुमारे 5 ते 7 दशलक्ष (50-70 लाख) लोकांना या समस्येचा सामना करावा लागतो. किडनी स्टोन म्हणजे किडनीमध्ये खनिजे आणि क्षारांनी बनलेले स्फटिक जमा होणे. या स्थितीमुळे तीव्र वेदना होऊ शकतात, काही लोकांना लघवीची समस्या देखील असते. त्याची लक्षणे वेळीच ओळखून, दगड काढून टाकण्यासाठी उपचार करण्याचा सल्ला दिला जातो.

मूत्रपिंड किंवा लघवीच्या मार्गात तयार होणारे कठीण स्फटिकजन्य पदार्थ मुतखडा किंवा किडनी स्टोन म्हणून ओळखले जातात. लघवीतील न विरघळलेले स्फटिकजन्य पदार्थ एकाच जागी जमा होऊन मुतखडा निर्माण करतात. मूत्रमार्गात जंतू संसगार्मुळे नायडस तयार होतो व त्याचे क्षार जमा झाल्याने त्याचे रूपांतर मुतखड्यात होते.

आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे की जे कमी पाणी पितात, मुतखड्याचा कौटुंबिक इतिहास आहे किंवा जास्त मीठ आणि साखरेचे सेवन करतात त्यांना किडनी स्टोन बनण्याचा धोका जास्त असतो. आहाराकडे लक्ष देण्यासोबतच पुरेसे पाणी प्यायल्यास ही समस्या टाळता येऊ शकते.

**किडनी स्टोन बनण्याची कारणे :-**

1. लघवीचे प्रमाण कमी होऊन मुतखडा तयार करणारी घटके जास्त प्रमाणात वाढल्याने.
2. लघवीतील न विरघळणारे स्फटिकजन्य पदार्थ एकत्रित जमा झाल्याने.
3. पाण्याचे शरीरात प्रमाण कमी झाल्याने.
4. मूत्रमार्गात होणारे जंतु संसगार्मुळे नायडस तयार होऊन क्षार बनल्याने.

**मुतखड्याचे प्रकार :-**

1. कॅल्शियमः कॅल्शियम ऑक्झॅलेट किंवा कॅल्शियम फॉस्फेटचे खडे तयार होऊन मुतखडा होतो.
2. युरिक ॲसिडः लघवीत युरिक ॲसिडचे प्रमाण वाढून त्याचे मुतखडे बनतात.

**लक्षणे :-**

मुतखड्याची लक्षणे साधारणपणे दिसून येत नाही. मुतखड्याची मूत्रमार्गात हालचाल होऊन अडथळा येतो त्यावेळी तीव्र वेदना जाणवते.

ज्या बाजूस मुतखडा असेल त्या बाजूस तीव्र वेदना होते.
पाठी, पोट, ओटीपोटात तीव्र वेदना होते.
लघवीमध्ये रक्त येणे किंवा लघवी करताना वेदना होणे.
लघवी पुन्हा-पुन्हा आल्याची संवेदना होते. लघवी करताना जळजळ होते.
ताप किंवा थंडी वाजून येणे.

**मुतखडा न होण्यासाठी करावयाचे उपाय :-**

पाणी जास्त पिणे.

जास्तीत जास्त पाणी पिणे हा निरोगी आयुष्यासाठी आणि मुतखड्यासारख्या विकारावर आळा घालण्यासाठी उत्तम उपाय आहे. मुतखड्यांना रोखण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे दररोज पुरेसे पाणी म्हणजेच 8 ते 12 ग्लास पाणी पिणे आवश्यक आहे.

आहारामधील सोडियम आणि प्राण्यांच्या मांसातून मिळणारी प्रथिने (मांस, अंडी) नियंत्रित ठेवल्यास मुतखड्यांचा त्रास टाळण्यास मदत होऊ शकते. मुतखडा होण्याची प्रवृत्ती टाळण्यासाठी जवाचे पाणी, उसाचा रस, काकवी यांचे सेवन करावे.

**औषधोपचार :-**

लिथोट्रिप्सी पद्धत : रुग्णाच्या शरीराच्या बाहेरून यंत्राद्वारे खड्याला सूक्ष्म ध्वनी कंपनीने शॉक देऊन त्याचा चुरा करणे. यामध्ये खड्यांचा चुरा लघवीवाटे बाहेर पडतो. त्यामुळे उपचारानंतर रुग्णाला भरपूर पाणी प्यायला सांगितले जाते. या पद्धतीत शस्त्रक्रियेची गरज नाही. शरीरातील कोणत्याही अवयवावर आघात किंवा जखम केली जात नाही.

परक्युटॅनिअस नेफ्रोलिथोटॉमी : या उपचारपद्धतीमध्ये दुर्बिणीच्या साह्याने शस्त्रक्रिया करून खडा शरीरातून बाहेर काढला जातो. दुर्बिणीद्वारे खडा काढण्याची ही उपचार पद्धती मूत्रपिंडातील व वरच्या मूत्र वाहिन्यातील विविध प्रकारच्या मोठ्या खड्यांसाठी जास्त योग्य आहे.

युरेटेरोस्कोपी : मूत्रवाहिनीत असलेले खडे युरेटेरोस्कोपीद्वारे काढता येतात.

**मुतखडाच्या वेदना दूर करण्यासाठी काही घरगुती उपाय :-**

1. अर्धा कप गरम पाण्यात साजूक तूप टाकून पिण्याने 15 मिनिटात पोटदुखी थांबते.
2. सराटा (काटेगोखरू)चा काढा तूप टाकून दिल्यास, मुतखडा पडून जाण्यास व वेदना कमी होण्यास मदत होते.
3. कुरडू नावाच्या वनस्पतीची अथवा वायवण्याची साल याचा स्वरस अथवा काढा घेतल्याने वेदना कमी होते.
4. कडुलिंबाच्या पाल्याची राख दोन ग्रॅम पाण्याबरोबर नियमित घेतल्याने मुतखडा विरघळून बाहेर पडतो.
5. खडा लहान असल्यास आणि जुना नसल्यास मेंदीच्या सालीचे बारीक वाटण करून चूर्ण सकाळी अर्धा चमचा पाण्या बरोबर नियमित घेतल्याने खडा विरघळून लघवी वाटे निघून जातो.

**किडनी स्टोन होण्यापासून कसे टाळावे?**

आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे, काही गोष्टी नेहमी लक्षात ठेवल्यास किडनी स्टोनची समस्या टाळता येते. शरीराला हायड्रेट ठेवणे, संतुलित आहार घेणे आणि पुरेसे कॅल्शियम घेणे, फळे आणि भाज्यांचे अधिक सेवन केल्याने ही समस्या टाळता येते. किडनी स्टोन टाळण्यासाठी पालक नीट धुवून शिजवून खाण्याचा सल्ला दिला जातो. तसेच पाण्याच्या स्वच्छतेची काळजी घेणे आवश्यक आहे.

# 200 पार डायबिटीज अन् कोलेस्ट्रॉलचा झाला असेल स्फोट तर तोंडात दाबून ठेवा हा पदार्थ

Diabetes अर्थात मधुमेह आणि High Cholesterol हे घातक आजार आहेत आणि ते खूप वेगाने वाढत असल्याचे दिसत आहे. या दोन आजारांमुळे Heart Attack, पक्षाघात, ङ्किलीट८ चे जुनाट आजार, मज्जातंतूंचे नुकसान, डोळ्यांचे आजार आणि न जाणो कितीतरी समस्या उद्भवू शकतात. रक्तात कोलेस्टेरॉल आणि साखर जास्त वाढल्याने हे घडते. अतिरिक्त ग्लुकोज आणि कोलेस्टेरॉल शरीरासाठी खूप वाईट ठरतात.

शरीर त्याला बाहेर फेकून देते पण अनेक कारणांमुळे जेव्हा ही घाण रक्तात राहते, तेव्हा रक्तातील साखर आणि एकूण कोलेस्टेरॉल 200 च्या पुढे जाते. ही पातळी धोकादायक मानली जाते. तज्ज्ञांच्या मते, ही पातळी डायबिटीज आणि हाय कोलेस्ट्रॉलची सुरुवात आहे. ही घाण शरीरातून बाहेर काढण्यासाठी शरीराला डिटॉक्स करणाऱ्या औषधी वनस्पती खाव्यात.



**बॉडी डिटॉक्स करणाऱ्या औषधी वनस्पती**

**त्रिफळा पावडर** : आवळा, बहेडा आणि हरड यांचे मिश्रण करून त्रिफळा पावडर बनवली जाते. शरीर डिटॉक्स करण्याचा हा एक अतिशय प्रभावी मार्ग आहे. ही पावडर कोणीही बनवू शकतो. एनसीबीआयच्या रिसर्चनुसार, या पावडरमध्ये खराब कोलेस्टेरॉल काढून टाकणारे गुणधर्म असतात. तसेच याच्या सेवनाने रक्तातील साखरेचे प्रमाण राखण्यास मदत होते.

**लसूण** : लसूण केवळ मसाला नाही तर त्यापेक्षा जास्त आहे. आयुर्वेदात लसूण हे शरीर शुद्ध करणारे मानले गेले आहे. त्याच्या पाकळ्या खाल्ल्याने कोलेस्ट्रॉल कमी होते आणि मधुमेहाच्या रुग्णांनाही आराम मिळतो. हे शरीरात नायट्रिक ऑक्साईड वाढवण्याचे काम करते, ज्यामुळे उच्च रक्तदाब देखील संपतो.

**दालचिनी** : चहापासून अनेक पदार्थांमध्ये दालचिनी टाकली जाते. अशी अनेक संशोधने आहेत जी दालचिनी हे मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर असल्याचे दर्शवतात. प्राण्यांवर केल्या गेलेल्या काही अभ्यासात हे कमी-घनतेचे लिपोप्रोटीन कमी करत असल्याचे देखील दिसून आले आहे.

**मेथी दाणे** : मेथी दाण्यांमध्ये अँटी डायबिटीक गुणधर्म असतात जे टाईप 2 डायबिटीज नियंत्रित करू शकतात. मेथी दाण्यांचे पाणी रोज प्यायल्याने हात पाय सुन्न होणे आणि रात्री सतत लघवीला होणे यासारख्या लक्षणांपासून सुटका मिळते. हा घरगुती उपाय एकूण कोलेस्ट्रॉल आणि

# कमकुवत २०६ हाडांना मजबूती देईल ही घरगुती प्रोटीन पावडर

वय वाढतं तसं हाडांमध्ये कमकुवतपणा येऊ लागतो. विशेषतः महिलांना ही समस्या अधिक जाणवते कारण बाळाला जन्म दिल्यानंतर हाडांमधील कॅल्शियम कमी होतं आणि हाडांमधील ही कमतरता भरून काढणे अत्यंत गरजेचे आहे. याशिवाय हाडं कमकुवत झाल्यास, शरीरामध्ये अनेक ठिकाणी दुखणे चालू होते. २०६ हाडांना मजबूती द्यायची असेल आणि बळकटी द्यायची असेल तर तुम्ही घरगुती ड्रायफ्रूट्स पावडर तयार करून त्याचा नियमित उपयोग करून घेऊ शकता. हीं' इङ्कल्ली२ साठी घरगुती पावडर तयार करून नियमित दुधासह याचे सेवन केल्याने हाडांना मजबूती मिळेल आणि हाडांच्या दुखण्यापासून तुम्हाला सुटका मिळेल. कशी बनवाल ही पावडर आणि कसा होतो फायदा जाणून घ्या





**हाडांच्या बळकटीसाठी घरगुती प्रोटीन पावडर साहित्य**

ही प्रोटीन पावडर बनविण्यासाठी तुम्हाला १ कप मखाणा, १ कप चणे, १ चमचा खसखस, १० खजूर, पाव कप बदाम, पाव कप खडीसाखर आणि १ चमचा सुंठाची पावडर इतके साहित्य लाते. हे सर्व साहित्य मिक्स करून हाडांना मजबूती देणारी प्रोटीन पावडर तुम्ही घरच्या घरी तयार करू शकता. या प्रोटीन पावडरचे फायदेही तुम्हाला आम्ही खाली सांगणार आहोत.

**कशी बनवाल प्रोटीन पावडर**

- ही पावडर बनविण्यासाठी सर्वात पहिले गॅसवर कढई ठेवा. त्यात मखाणे भाजून वेगळे काढून ठेवा
- त्यानंतर कढईत बदाम आणि खसखस भाजून घ्या
- हे भाजून झाल्यावर नंतर चणे आणि खजुराची बी काढून सर्व एकत्र भाजा
- सर्व भाजल्यानंतर थंड करायला ठेवा आणि मग मिक्सरमधून पावडर वाटून घ्या
- जराशी वाटून झाल्यावर त्यात खडीसाखर आणि सुंठ पावडर मिक्स करा आणि पुन्हा मिक्सरमधून काढा

**कसा करा पावडरचा वापर**

ही घरगुती प्रोटीन पावडर एका कोरड्या डब्यात तुम्ही भरून ठेवा आणि रोज रात्री ही ड्रायफ्रूट्स पावडर दुधात १ चमचा मिक्स करून प्या. ही पावडर दुधात मिक्स करून खाल्ल्याने शरीरातील कॅल्शियममध्ये वाढ होते आणि शरीर तंदुरूस्त होऊन हाडंही मजूबत होण्यास मदत मिळते. याशिवाय दिवसभर तुम्हाला चांगली उजार्ही प्राप्त होते.





सध्या अनेक भागात पाऊस पडत आहे. त्याचबरोबर पावसाळ्यात त्वचेची विशेष काळजी घ्यावी लागते. आजच्या हवामानात त्वचेची अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. कधी ऊन पडते तर कधी दिवसभर पाऊस सुरू होतो. या पावसाळ्यात आर्द्रता आणि आर्द्रतेचा थेट परिणाम आपल्या त्वचेवर होतो. त्यामुळे अनेकांना त्वचेच्या समस्या होतात. त्यामुळे पावसाळ्यात त्वचेची विशेष काळजी घ्यावी लागते.

पावसाळ्यात तुम्ही त्वचेची काळजी घेतली नाही तर मुरुम आणि मुरुमांच्या समस्येने पावसाळ्यातही तुमची त्वचा निरोगी, डागरहित आणि चमकदार ठेवण्यासाठी तुम्ही काही स्किन केअर टिप्स फॉलो करू शकता. चला जाणून घ्या.

**चेहरा स्वच्छ करा –**

पावसाळ्यात चेहरा स्वच्छ ठेवणे खूप गरजेचे आहे. म्हणूनच दिवसातून किमान दोनदा चेहरा स्वच्छ करणे आवश्यक आहे. तुमचा चेहरा स्वच्छ करण्यासाठी तुम्ही ग्रीन टी फेस वॉश, निम फेस वॉश आणि टी ट्री फेस वॉश वापरू शकता.

**गुलाब पाण्याने चेहरा उजळेल–**

गुलाबपाणी हे चेहऱ्यासाठी एक असे टोनर आहे, ज्याच्या रोजच्या वापराने तुमच्या चेहऱ्यावर चमक येते. त्यामुळे पावसाळ्यात चेहऱ्यावर क्रीम लावण्याऐवजी गुलाबपाणी वापरू शकता.

**जादा तेल–**

जर तुमची त्वचा तेलकट असेल तर डस्टिंग पावडरचा वापर करावा. जर तुम्ही डस्टिंग पावडरचा वापर केला नाही तर चेहऱ्यावर अतिरिक्त तेल आल्याने त्वचेच्या समस्या उद्भवू शकतात.

**लाईट फेस ऑइल–**

पावसाळ्यातही चेहऱ्यावर मॉइश्चरायझर राखणे आवश्यक आहे. म्हणूनच तुम्ही हलके फेस ऑइल निवडू शकता. यामुळे मुरुम आणि मुरुमांची समस्या राहणार नाही.

# त्वचा उजळण्यासाठी हळदीचा अशा प्रकारे वापर करा

त्वचा सतत चमकदार असावी असे कोणाला वाटत नाही. सुंदर आणि चमकदार त्वचा मिळविण्यासाठी लोक अनेक पद्धतींचा अवलंब करतात. अनेकजण पार्लरमध्ये जाऊन हजारो रुपये खर्च करतात, तर पैसे आणि वेळेअभावी अनेकांना पार्लरमध्ये जाता येत नाही. पार्लरमध्ये उपलब्ध असलेल्या स्किन केअर ट्रीटमेंटचा प्रभाव काही दिवस टिकतो, पण जर तुम्हाला कायमस्वरूपी चमकणारी त्वचा हवी असेल, तर त्यासाठी काही घरगुती उपायांमध्ये हळदीचा वापर करावा. हळदीचा नियमित वापर केल्यास चेहऱ्यावरील अनेक समस्या दूर होतात. त्वचेची काळजी घेण्यासाठी हळदीचा वापर वषार्नुवर्षे होत आहे. हळदीमध्ये असे घटक आढळतात, जे त्वचेसाठी खूप फायदेशीर असतात.



हळद आणि चंदन-

जर तुमच्या चेहऱ्यावर मुरुमांची खूप समस्या असेल तर तुम्ही हळदीमध्ये गुलाबपाणी, चंदन पावडर आणि मध मिसळून फेस पॅक बनवू शकता. चेहऱ्याची चमक कायम ठेवण्यासाठी हे खूप फायदेशीर आहे.

**हळद आणि दही–**

त्वचा उजळण्यासाठी ताजे दही आणि बेसनामध्ये हळद मिसळून फेस पॅक बनवा. हा पॅक चेहऱ्यावर लावा आणि कोरडे होईपर्यंत राहू द्या. पॅक सुकल्यावर कोमट पाण्याने चेहरा धुवा. हा पॅक चेहऱ्यावरील डाग दूर करण्याचे काम करतो.

**दूध आणि हळद–**

जर तुम्हाला वृद्धत्व थांबवायचे असेल तर तुम्ही दूध आणि हळदीचा फेस पॅक बनवू शकता. हा पॅक बनवण्यासाठी 3 चमचे दुधात एक चतुर्थांश चमचे हळद मिसळा. आता या पॅकने चेहऱ्याला मसाज करा. दूध सुकल्यावर 10 मिनिटांनी चेहरा धुवा.

**हळद आणि तांदळाचे पीठ–**

जर तुमच्या डोळ्यांखाली काळी वतुर्ळे असतील तर तांदळाचे पीठ, टोमॅटोचा रस आणि कच्च्या दुधात हळद मिसळून पॅक तयार करा. 15 मिनिटे चेहऱ्यावर लावा आणि नंतर चेहरा धुवा. काही दिवसांनी तुम्हाला त्याचा परिणाम दिसेल.

**हळद आणि गुलाबपाणी–**

गुलाब पाण्यात हळद मिसळून लावल्यास चेहऱ्याची चमक वाढण्यास मदत होते. हा फेस पॅक बनवण्यासाठी तुम्हाला 2 चमचे बेसन, अर्धा चमचा हळद आणि 3 चमचे गुलाबपाणी लागेल. ही पेस्ट त्वचेवर 20 ते 25 मिनिटे लावून ठेवा आणि नंतर चेहरा धुवा.

# बटर कॉफीने मेणासारखे वितळतील फॅट्स



डिलिव्हरी नंतर वजन वाढणे ही फार सामान्य समस्या झाली आहे. पण त्यानंतर पुन्हा वजन कमी करणे ही फार अवघड गोष्ट होते असा बहुतेकांचा अनुभव आहे. अशात काय खावे आणि काय खाऊ नये याविषयी अनेक संभ्रम निर्माण होतात. पण जर कोणी स्वतः त्याचा फायदा अनुभवला असेल तर विश्वास ठेवणं सोपं होतं. काही अभ्यासांतून या बटर कॉफीने खरंच वजन कमी होतं का, याचं उत्तर आपल्याला मिळू शकतं. जाणून घेऊया.

**काय सांगतो अभ्यास?**

हेल्थलाइननुसार बटर कॉफी मध्ये कॉफी पावडर, अनसॉल्टेड बटर आणि एमसीटी (medium chain triglycerides) मिसळ्लेलं असतं. एमसीटी सहज पचणारा फॅट असतो. जो खोबरेल आणि पाम कर्नेल तेलाने प्रयोगशाळेत बनवला जातो.

हैद्राबादच्या एका वरिष्ठ डायटिशीयनच्या म्हणण्यानुसार या हे ड्रींक अमेरिकेचे उद्योजक डेव एस्प्रे यांनी फेमस केलं होतं. त्यांचं म्हणणं होतं की हे ड्रिंक एनर्जी देतं, एकाग्रता वाढवतं आणि वजन कमी करण्यातही मदत करतं.

डेव एस्प्रे यांच्यानुसार बटर कॉफीमध्ये कॅफेन आणि हेल्दी फॅट जास्त असतात. ज्यामुळे सतर्कता वाढते. शिवाय हाय फॅटमुळे भूक कंट्रोल होऊन कॅलरी इंटेक कमी होतो.

237 ml म्हणजेच एक कप बटर कॉफीमध्ये २ चमचे खोबऱ्याचे तेल आणि बटर असते. त्यात ४४५ कॅलरी आणि ५० ग्रॅम फॅट असते.

बटर कॉफी पिणाऱ्यांचे म्हणणे आहे की, यामुळे भूक मरते आणि त्यामुळे वजम कमी होण्यास मदत होते.

अभ्यासानुसार बटर कॉफीमध्ये जास्त प्रमाणात फॅट असल्याने पचन क्रिया मंदावते आणि भूक कमी होते.

इतर काही संशोधनांनुसार देखील हेच सिद्ध झाले आहे.

या संशोधनादरम्यान 4 आठवडे पुरुषांनी २२ ग्रॅम एमसीटी तेलाचे नाश्त्यात सेवन केले. निरीक्षणातून असं लक्षात आलं की , नंतर दुपारच्या जेवणात त्यांनी २२० कॅलरीज कमी सेवन केले.

संशोधनातून हे पण समोर आलं आहे की, जर एमसीटीला डाएटमध्ये घेतल्यावर जर कमी कॅलरीजचं डाएट घेतलं तर वजन वेगात कमी होतं.

**डाएट कसे असावे?**

जर तुम्हीही बटर कॉफी पित असाल तर आपल्या डाएटची काळजी घ्या. त्यात जास्त प्रोटीन, फळ आणि भाज्यांचा समावेश असू द्या.

बटर कॉफीत फॅट बऱ्याच प्रमाणात असल्याने इतर जेवणात कमी फॅट घ्यावे.

बटर कॉफीत सॅच्युरेटेड (खराब फॅट्स) पण भरपूर आहे. त्यामुळे दिवसभरात एवोकाडो, नट्स, धान्य आणि मासे असे मोनो आणि पॉलीअनसॅच्युरेटेड फॅट्सचे (हेल्दी) सेवन करावे.

# जास्तीत-जास्त ताक प्या आणि वजन कमी करा



वजन कमी करणे सोपे काम नाही. वजन कमी करण्यासाठी वर्कआऊटसोबतच तुम्हाला तुमच्या आहाराची विशेष काळजी घ्यावी लागते. आपले वजन कमी करण्यासाठी लोक जिमपासून योगा आणि डाएटिंगपर्यंत सर्व काही फॉलो करतात. कठोर परिश्रम आणि कठोर दिनचयार्चे पालन केल्याने वजन कमी होते, परंतु वजन कमी झाल्यामुळे लोक पुन्हा जुनी दिनचर्या पाळू लागतात. अशा स्थितीत आपले वजन पुन्हा हळूहळू वाढू लागते. अनेक वेळा सकस आहार आणि कमी कॅलरीजमुळे आपले वजन कमी होत नाही. पण इथे तुम्हाला तुमचे वजन कमी करण्यासाठी अगदी सोप्या पद्धतीने टिप्स सांगणार आहोत. ताक घेऊनही तुम्ही तुमचे वजन सहज कमी करू शकता.

**शिकंजी ताक**

शरीरातील चरबी बर्न करण्यासाठी शिकंजी ताक हा उत्तम पर्याय असू शकतो. शिकंजी ताक आपल्या पोटाची चयापचय क्रिया वाढवते. एवढेच नाही तर हे ताक आपले पोट भरलेले तर राहतेच पण कॅलरीज बर्न करण्यासही मदत करते. हे करण्यासाठी साध्या ताकामध्ये लिंबू आणि काळे मीठ मिसळा. तुम्हाला हवे असल्यास त्यात पुदिन्याची पानेही टाकू शकता.


**चिया सीड्स ताक**

चिया सीड्स आरोग्याच्या दृष्टीने निरोगी मानल्या जातात. चिया बियांमध्ये फायबर आढळते. याचे जेल कंपाऊंड आपल्या शरीरातील चरबी काढून टाकण्याचे काम करते. तुम्ही तुमच्या ताकामध्ये चिया बिया मिक्स करून ते पिऊ शकता. वजन कमी करणाऱ्या लोकांसाठी सर्वोत्तम पेय.

**जवसाच्या बियांचे ताक**

जवसाच्या बियांचे ताक पिण्यापूर्वी त्याच्या बिया भाजून पावडर तयार करा. याच्या बिया ताकात मिसळून प्या.याने शरीरातील चयापचय गतिमान होण्यास मदत होते. जवसामध्ये भरपूर फायबर असते, जे शरीरात साठलेली चरबी बर्न टाकते.

# जाणून घ्या च्युइंगम खाण्याचे फायदे



च्युइंगम चघळणे ही अनेकांची सवय असते. तुम्ही बऱ्याच लोकांकडून ऐकले असेल की ते आरोग्यासाठी चांगले नाही, तर काही लोक च्युइंगम चा सल्ला देतात. पण तुम्हाला माहित आहे का, च्युइंगम चेहऱ्यावरील चरबी कमी करण्यास मदत करू शकते. च्युइंगम खाण्याचे फायदे जाणून घ्या.

**कॅलरीज बर्न होतात**

जेव्हा तुम्ही गम चघळता तेव्हा ते तुमच्या संपूर्ण जबड्याला व्यायाम देते. जे कॅलरीज बर्न करण्यास मदत करू शकतात. तथापि, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की वजन कमी करण्यासाठी फक्त च्युइंगम पुरेसे नाही. निरोगी आहार आणि व्यायामाव्यतिरिक्त, तुम्ही च्युइंगमला तुमच्या वजन कमी करण्याच्या एक भाग बनवू शकता.

**भूक मंदावते**

भूक कमी करण्यासाठी बरेच लोक गम चघळतात. यामुळे तुम्ही कमी खातात, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. याशिवाय मेंदूसाठी फायदेशीर आहे. ते चघळल्याने तणावही कमी होतो. अन्न खाल्ल्यानंतरही काहींना थोडेसे खाण्याची इच्छा होते. त्यामुळे तुमचे वजन झपाट्याने वाढू शकते. या प्रकरणात, आपण च्यूइंग गम चघळू शकता. त्यामुळे तुमची भूक कमी होते. जेणेकरून तुम्ही जास्त खाणे टाळू शकता.

**चेहऱ्याची चरबी कमी करा**

वजन कमी करण्यासाठी आणि चेहऱ्यावरील चरबी कमी करण्यासाठी च्युइंगम खूप उपयुक्त ठरू शकते. त्यामुळे तुम्हाला वजन कमी करायचे असेल तर तुम्ही च्युइंगम चघळू शकता.

**थकवा दूर करते**

जर तुम्हाला थकवा जाणवत असेल तर तुम्ही च्युइंगम चघळले पाहिजे. याच्या मदतीने तुम्हाला एक्टिव वाटेल.

**श्वासाची दुर्गंधी दूर करते**

तोंडाच्या दुर्गंधीमुळे त्रास होत असेल तर या समस्येवर मात करण्यासाठी तुम्ही च्युइंगमचा वापर करू शकता. यामुळे दुर्गंधी दूर होण्यास मदत होते.

## धर्मवीर दिघेंच्या मठाजवळ प्राचीन अवशेष सापडले

# प्राचीन ठेव्याबाबत पुरातत्त्व विभागाकडून तपास सुरू

**■बातमी/ लेख प्रीती दीपक नाईक :** ठाणे शहराच्या टेंभी नाका परिसरातील धर्मवीर आनंद दिघे यांच्या मठाजवळ सुरू असलेल्या एका खासगी इमारतीच्या बांधकामावेळी काही नक्षीकाम केलेले प्राचीन दगडी अवशेष सापडल्याची माहिती समोर आली आहे. या तुकड्यांमध्ये प्राचीन मंदिरांच्या खांबांचे, तुळयांचे वा शिल्पांचे अवशेष असल्याचा संशय व्यक्त होत असून, हे अवशेष भूमीमध्येच टाकून देण्यात येतील की चोरीला जातील, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते कैलास म्हापदी यांनी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्याकडे तक्रार दाखल केली. त्यांनी तातडीने पुरातत्त्व विभागाला याप्रकरणी शास्त्रशुद्ध चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करण्याचे



बाराशे वर्षांचा इतिहास सांगणाऱ्या ठाण्याच्या श्रीकौपीनेश्वर मंदिरासारख्या वास्तू, महागिरी टेकडी, दगडी शाळा, चेंदणी कोळीवाडा, हिराकोट, खारकर आळी, बीवलकर वाडा यांसारख्या अनेक ऐतिहासिक वास्तू आज नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. उत्खननात सापडलेले शिलालेख, मूर्ती व शिल्प हे अनेक वेळा जमीन भरावासाठी वापरण्यात आले आहेत, ही बाब इतिहासप्रेमींसाठी चिंतेची बाब ठरत आहे.

निर्देश दिले आहेत. भिवंडीतील लोणाड येथे शिलाहार कालीन राजपत्र सापडले होते, पण सध्या ते एका कोपऱ्यात पडून आहे. त्याचप्रमाणे कौपीनेश्वर मंदिराचीही दुरवस्था झाली असून, जीर्णोद्धाराचा प्रकल्प रखडला आहे. मंदिराचा सभामंडप देखील अलीकडेच धोकादायक झाल्यामुळे तोडण्यात आला आहे. ठाण्यात हजुरी येथे महापालिकेच्या सहकार्याने प्राच्यविद्या संग्रहालय असूनही, अशा ठेव्यांबाबत पुरेसे जनजागृती नाही. कै. हरिभाऊ शेजवळ, कै. दाऊद दळवी, सदाशिव टेटविलकर अशा प्राच्यविद्या संशोधकांनी ठाण्याला समृद्ध ऐतिहासिक ओळख दिली. त्यामुळे आता या वारशाचे योग्यरित्या संवर्धन करण्यासाठी शासन, प्रशासन आणि नागरिकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

# १९ कोटींच्या डब्यांसाठी पालिका आग्रही

## मुंबई आयआयटीकडून तांत्रिक मंजुरी देण्याची मागणी

**■भाईंदर :** मीरा-भाईंदर महापालिकेने १९ कोटी खर्चून कचऱ्याचे डबे खरेदी करण्याचा चंगच बांधला आहे. महापालिकेने मुंबईच्या आयआयटीला पत्र पाठवून निविदेतील कचऱ्याच्या डब्यांच्या दरांची पडताळणी करण्यासह तांत्रिक मंजुरी देण्याची विनंती केली आहे. इतकेच नव्हे तर या कामासाठीचे शुल्क देण्यास देखील महापालिकेने तयारी दर्शवली आहे.

शासनाच्या मूलभूत सोयीसुविधांचा विकासासाठी विशेष तरतूद योजनेंतर्गत महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी ३० जून रोजी ३ हजार ८८९ कचऱ्याच्या डब्यांच्या खरेदीसाठी १८ कोटी ६५ लाख ३८ हजार ८०८ रुपयांचा ठेका कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चरला देण्याची निविदा मंजूर केली. सोलार पॅनलसह ऑटोमॅटिक कचऱ्याचे २१ डबे खरेदी व प्रति डबा तब्बल ९ लाख ३४ हजार ५६० रुपये, स्टेनलेस स्टील वा पावडर




**सखोल चौकशीची मागणी**

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सदर डबे खरेदी प्रकरणाची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिली आहे. शासनाच्या निधीतून कचरा डबे खरेदी केले जाणार असल्याने महापालिकेने बाजार भावापेक्षा जास्त दराने ते खरेदी करू नये व शासकीय निधीचा अपव्यय होऊ नये म्हणून सखोल चौकशी करण्याची मागणी मंत्री सरनाईक यांनी केली आहे.

कोटेड वा ॲल्युमिनियमचे असे ३ स्टेनलेस स्टील डब्यांचे प्रति संच ६९ हजार ६८८ रुपये प्रमाणे ५०० संच खरेदी, तर २ डब्यांचे प्रति संच ६६ हजार १८३ रुपये प्रमाणे ५०० संच खरेदी, तर फायबरचे १२० लि., २४० लि. व १९० लिटर क्षमतेचे प्रति कचरा डबा ३४ हजार ५११ रुपये प्रमाणे २ हजार ८६८ डब्बे खरेदीची निविदा आयुक्तांनी प्रशासकीय अधिकारात मंजूर केल्यानंतर त्यावर आरोप आणि टीकेची झोड उठली आहे.

१९ कोटीची खिरापत कचऱ्याच्या डब्यांसाठी वाटण्याऐवजी नागरिकांना दिलासा मिळेल, अशी कामे करण्याची मागणी होत आहे. कचऱ्याच्या डब्यांचे अव्वाच्यासव्वा दर पाहून सामान्य नागरिकांचे देखील डोळे पांढरे झाले आहेत.

परंतु महापालिका प्रशासन मात्र १९ कोटींचे कचऱ्याचे डबे खरेदी करण्याचा चंग बांधून आहे. आरोप व टीका होऊन देखील पालिकेचे शहर अभियंता दीपक खांबित यांनी मुंबई आयआयटीचे डॉ. अनिल दीक्षित यांना तातडीने पत्र पाठवून निविदेतील डबे खरेदीचे दर याची पडताळणी आणि तांत्रिक मंजुरी देण्याची विनंती केली आहे. पत्रामध्ये घनकचरा प्रकल्प अंतर्गत कचऱ्याचे डबे खरेदी कामाचे अंदाजपत्रक तयार केले आहे. त्यात पालिकेने कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर या ठेकेदाराच्या मंजूर निविदेतील डब्यांचे विविध प्रकार आणि दर यांचा तक्ता दिला आहे. सदर अंदाजपत्रकातील दर यांची तपासणी करण्यासह तांत्रिक मंजुरी देण्याचे पालिकेने नमूद केले आहे. या तांत्रिक मंजुरी व दराची तपासणीसाठी आवश्यक असलेले शुल्क देखील आयआयटीला देण्याची तयारी पालिकेने दर्शवली आहे. त्यामुळे महापालिका प्रशासन कचऱ्याच्या डब्यांवर १९ कोटी खर्च करण्यावर ठाम असल्याचे मानले जात आहे. पण महापालिका प्रशासन बड्या ठेकेदारांच्या फायद्याच्या अटींना पाठिंबा देत आहे, अशी टीका नागरिकांकडून केली जात आहे.

**लोकांमध्ये नाराजी**

निविदा प्रक्रिया, ठेकेदारास फायद्याच्या अटी आणि दर यावर संशय व्यक्त होऊन चौकशी करण्यापासून गुन्हे दाखल करण्यापर्यंतच्या मागण्या व तक्रारी होत आहेत. कचरा डबे उत्पादक कंपन्यांकडून थेट दर का मागवले गेले नाहीत? असा सवाल केला जात आहेत. याआधी देखील निवडणुकीच्या अनुषंगाने नगरसेवकांच्या ठरावावरून पालिकेने कचऱ्याचे डबे असेच अवास्तव दराने खरेदी केले होते. ते डबे फारसे टिकले नाहीत तर अनेक डबे चोरीला गेले. त्यामुळे तब्बल १९ कोटी खर्चून कचऱ्याचे डबे खरेदीबद्दल लोकांमध्ये नाराजी आहे.

# पेणमधील सावकारांच्या घरासह हॉटेलवर छापे




"विनापरवाना सावकारी व्यवसाय करणाऱ्यांकडून कोणताही सावकारी व्यवहार करु नये. परवानाधारक सावकाराकडून व्याजाचा दर सरकारने निश्चित केला आहे. त्यानुसारच व्यवहार करावा. बेकायदा सावकारी करणाऱ्या व्यक्तीवर दोष सिद्ध झाल्यास ५० हजार रुपये दंड आणि पाच वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते."

**–प्रमोद जगताप, जिल्हा उपनिबंधक**

**■अलिबाग :** गरजूंच्या आर्थिक अडचणींचा गैरफायदा घेत त्यांची लूट करणाऱ्याचा आरोप असलेल्या पेणमधील दोन परवानाधारक सावकारी व्यवसाय करणाऱ्यांवर रायगड पोलीस आणि जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने कारवाईचा बडगा उगारला आहे. सूर्यकांत जोमा पाटील (७०) आणि भरत सूर्यकांत पाटील (३५) अशी त्यांची नावे आहेत. रायगड पोलिसांनी त्यांची दोन घरे आणि हॉटेलवर छापे टाकून काही कागदपत्रे जप्त केली आहेत. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (जिल्हा उपनिबंधक प्रमोद जगताप) आणि पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पेण सहाय्यक निबंधक सुभाष काळे आणि त्यांच्या पथकाने स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या सहाय्याने ही कारवाई केली आहे. सूर्यकांत ऊर्फ सुरेश पाटील आणि भरत सूर्यकांत पाटील यांच्या सावकारी जाचाला तसेच पिळवणुकीला कंटाळलेल्या काही पीडित ग्रामस्थांनी पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांची भेट घेत व्यथा मांडत लेखी तक्रार अर्ज दिले होते. त्यानंतर आंचल दलाल यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे प्रभारी पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांना 'सहकार पणन व वस्त्रोद्योग' अलिबाग या विभागशी संपर्क करून तात्काळ कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना केल्या होत्या. या कारवाईत पाटील पिता-पुत्रांचे चिंचपाडा येथील आमंत्रण बिल्डिंगमधील ३०१ आणि २०२ नंबरचे फ्लॅट तसेच त्यांच्या गोमांतक हॉटेलवर छापे टाकण्यात आले. तेथून काही कागदपत्रे जप्त करण्यात आली. ही कारवाई शुक्रवारी (१८ जुलै) दुपारी १२ ते साडेचार या कालावधीत करण्यात आली. त्यानंतर घरझडती घेत पोलिसांनी पंचनामे केले. त्यावेळी त्यांच्याकडे काही बेकायदा दस्तावेज आढळल्याचे सांगण्यात येते. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर जाधव, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रसाद पाटील, प्रसन्ना जोशी, पोलीस हवालदार मोरेश्वर ओंबळे, सचिन वावेकर महिला पोलीस हवालदार अस्मिता म्हात्रे, रेखा म्हात्रे, झुलीता भोईर, पोलीस शिपाई बाबासो पिंगळे, अक्षय जगताप, ईश्वर लांबोटे, ओमकार सोंडकर तसेच पथकप्रमुख सहकारी संस्था पनवेलच्या सहाय्यक निबंधक भारती काटुळे, सहकारी संस्था, अलिबाग (प्रशासन) सहाय्यक निबंधक अविनाश इंगळे, सहकारी संस्था महाडचे सहाय्यक निबंधक तुषार लाटणे यांच्या मार्गदर्शनाखाली शुभम कुलकर्णी, रामचंद्र बिलये, दिलीप सोनावणे, मकरंद दरवडे, शाम कपोते, के. पो. चौधरी, सुरेखा पाटील, नितेश सोनावणे, अश्विनी शिंदे, मिलिंद जोधळे आदींचा सहभाग होता.


## 'पॉटहोल क्विक फिक्स' ॲपद्वारे खड्ड्यांच्या साडे तीन हजार तक्रारी

# महानगरपालिकेकडून ३ हजार २३७ तक्रारींचे निवारण

**■मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या 'पॉटहोल क्विक फिक्स' मोबाईल ॲपवर गत ४० दिवसांत खड्ड्यांविषयी एकूण ३ हजार ४५१ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी ३ हजार २३७ तक्रारींचे निवारण ४८ तासांच्या आत पालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. तर, उर्वरित ११४ तक्रारींचे निवारण करण्याची कार्यवाही सुरू आहे.

खड्ड्यांव्यतिरिक्त इतर विभागांच्या ९३१ तक्रारी देखील या ॲपवर प्राप्त झाल्या आहेत. त्या तक्रारी संबंधित विभागांकडे पाठविण्यात आल्या आहेत, अशी माहिती यावेळी पालिका अधिकाऱ्यांनी दिली.

महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी शुक्रवारी 'पॉटहोल क्विकफिक्स' ॲपद्वारे प्राप्त होणाऱ्या तक्रारी, त्यांचे निवारण, प्रत्यक्षातील कार्यपद्धती यांचा आढावा घेतला. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर, प्रमुख अभियंता (रस्ते व वाहतूक) शिरीश निकम यांच्यासह संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.




**असे आहे ॲप**

पावसाळ्यादरम्यान रस्त्यांवर दिसून येणारे खड्डे तसेच दुरुस्तीयोग्य रस्त्यांसाठी महानगरपालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने 'पॉटहोल क्विकफिक्स' हे ॲप विकसित केले आहे. त्यात खड्ड्यांचे छायाचित्र, स्थान आणि वर्णन अपलोड करून तक्रार त्वरित नोंदवता येते.

# मालेगावी महिला कर्मचाऱ्यांचा छळ...

## विशाखा समितीकडे तीन तक्रारी, प्रकरण काय?

**■मालेगाव :** मंत्री-अधिकाऱ्यांचे हनी ट्रॅप प्रकरण, नाशिक जिल्हा परिषद व जिल्हा रुग्णालयात महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक छळाचे प्रकरण राज्यभर गाजत असतानाच मालेगाव पंचायत समितीच्या शिक्षण व ग्रामपंचायत विभागात महिला कर्मचाऱ्यांचा छळ झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत विशाखा समितीकडे प्राप्त झालेल्या तीन तक्रारी निकाली काढल्याचा दावा तालुका पशुधन विकास अधिकारी तथा विशाखा समितीच्या अध्यक्ष डॉ. मयुरा अरबट यांनी केला आहे. यानिमित्ताने पंचायत समिती ग्रामपंचायत विभागात विस्तार अधिकारी असलेल्या अधिकाऱ्याच्या 'थोर' कायार्ची दबक्या आवाजात शहरभर चर्चा आहे. मालेगाव पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील एका शिक्षणविस्तार अधिकारी व मुख्याध्यापकाविरुद्ध तसेच पंचायत समितीच्या ग्रामपंचायत विभागातील विस्तार अधिकाऱ्याबाबत विशाखा समितीकडे तक्रारी दाखल झाल्या होत्या. मात्र, राजकीय दबाव व संबंधित विस्तार अधिकारी जिल्ह्यातील एका बड्या नेत्याचे प्रशासकीय कामकाज पाहत असल्यामुळे तक्रारदार पीडित महिलांनी पुरावे देण्यास नकार दिला. याबाबत विशाखा समितीने तीन वेळा तक्रारदार महिलांसोबत बैठक घेतली आहे. या बैठकीत त्यांनी तक्रार मागे घेत असल्याचा दावा विशाखा समितीच्या अध्यक्ष अरबट यांनी केला आहे, तर मुख्याध्यापकाबाबत आपसात तडजोड झाली आहे. शिक्षण विस्तारअधिकारी सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या छळाचे प्रकरण मिटल्याची चर्चा प्रशासकीय यंत्रणेत आहे.



अध्यक्ष-डॉ. मयुरा अरबट, सचिव- कविता कुंवर, सदस्य- कामिनी कुमावत, सुमन पाटील, कोमल सुरंजे, वैशाली गवळी, सुनीता पाथरे, वैशाली खैरनार, स्वाती देशमुख, संगीता पवार, भारती बोऱ्हाळे अशा अकरा महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समितीत समावेश आहे. दर महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी समितीची बैठक होते. जिल्हाभर महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक छळाचे प्रकरण गाजत असताना येथील पंचायत समिती कार्यालयाच्या दर्शनी भागात विशाखा समितीचा फलक कुठेच दिसत नाही. या कार्यालयात विशाखा समितीसाठी स्वतंत्र कक्ष व फलक नसल्याचे या निमित्ताने उघडकीस आले आहे.

# पतीला शारीरिक संबंधाला नकार देणे हा छळच... हायकोर्टाचा निर्वाळा, घटस्फोटाला आव्हान देणारे पत्नीचे अपिल फेटाळले

**असे आहे प्रकरण**

पुण्यातील कुटुंब न्यायालयाने २८ नोव्हेंबर २०१९ रोजी पतीला क्रूरतेच्या कारणावरून घटस्फोट मंजूर केला होता. दाम्पत्याचे १२ डिसेंबर २०१३ रोजी लग्न झाले होते. मात्र संसाराच्या एका वर्षातच दोघांमध्ये टोकाचे मतभेद झाले आणि १४ डिसेंबर २०१४ रोजी ते दोघे एकमेकांपासून वेगळे झाले. सुरुवातीला एप्रिल २०१५ मध्ये दोघांनी परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अर्ज केले होते. तथापि, जुलै २०१५ मध्ये पत्नीने तिला जबरदस्तीने याचिका दाखल करण्यास भाग पाडल्याचा आरोप केला आणि घटस्फोटासाठी दिलेली संमती मागे घेतली होती. नंतर तिने पती व त्याच्या कुटुंबियांविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली होती.



**■मुंबई :** पतीसोबत शारीरिक संबंध ठेवण्यास नकार देणे, विवाहबाह्य संबंध असल्याचा आरोप करणे तसेच पतीचा मित्रांसमोर अपमान करणे हा पत्नीने केलेला छळ आहे. यातून क्रूरता सिद्ध होते, असा निर्वाळा उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला आणि घटस्फोटाच्या आदेशाला आव्हान देणारे महिलेचे अपिल फेटाळले. न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

पत्नीने पतीचा त्याच्या मित्रांसमोर अपमान करणे आणि त्याच्या कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन करणे हा पतीला मानसिक त्रास देण्याचाच प्रकार आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे. पुण्यातील कुटुंब न्यायालयाने क्रूरतेच्या आधारे पतीला त्याच्या पत्नीपासून घटस्फोट मंजूर केला होता. त्या आदेशाला महिलेने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते आणि वैवाहिक हक्क परत मिळवून देण्याची विनंती केली होती. तिच्या अपिलावर न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठाने सुनावणी घेतली. यावेळी दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर पत्नीनेच पतीचा छळ केल्याच्या वस्तुस्थितीवर खंडपीठाने शिक्कामोर्तब केले. पती हा त्याच्या कुटुंबाच्या व्यवसायाचा एक भाग आहे. पत्नीने पतीच्या कर्मचाऱ्यांसोबत केलेले वर्तन नक्कीच पतीला त्रास देणारे आहे. पतीला त्याच्या मित्रांसमोर अपमानित करणे ही 'क्रूरता' आहे. त्याचबरोबर शारीरिक संबंध ठेवण्यास नकार देणे आणि पतीवर विवाहबाह्य संबंधांचे आरोप करणे ही देखील पत्नीने पतीसोबत केलेली क्रूरता आहे, असे निरिक्षण खंडपीठाने नोंदवले आहे.

## पुण्यात भरपावसात विवाहितेवर अत्याचार

# नवऱ्याने संशय घेत घराबाहेर काढलं

**■पुणे :** पवना धरणाच्या ठाकुरसाई रस्त्यावर दुचाकीवर आलेल्या अनोळखी इसमाने एका महिलेला निर्जन भागात नेऊन बळजबरीने अत्याचार केला. ही हृदयद्रावक घटना १५ जुलै रोजी दुपारी सुमारे दोनच्या सुमारास घडली. पावसामुळे रस्ता सुनसान होता आणि नेमका याच परिस्थितीचा फायदा घेत आरोपीने अमानुष कृत्य केले. या प्रकरणात लोणावळा ग्रामीण पोलिसांनी अवघ्या २४ तासांत आरोपीला अटक करून तत्परतेचे उदाहरण घडवले आहे.

पीडित महिला एका डोंगरी भागात राहणाऱ्या कातकरी समाजातील असून, पावसात छत्री घेऊन रस्त्याच्या कडेला एकटी जात असताना आरोपीने तिचा पाठलाग केला. पुढे गाडी आडवी लावून तिला शेताच्या बांधाजवळील झुडपात नेले आणि तिच्यावर बलात्कार केला. महिलेनं जीवाच्या आकांताने आरडाओरड केली, पण पावसामुळे कोणीही आसपास नव्हते. आरोपीने कृत्य केल्यानंतर घटनास्थळावरून पळ काढला.

घाबरलेली महिला थेट आपल्या पतीकडे गेली. पण दुर्दैवाने त्याने तिच्यावरच संशय घेतला आणि घराबाहेर काढले. नाइलाजाने ती आईकडे गेली आणि घटनेची माहिती दिली. त्यानंतर तिने १६ जुलै रोजी लोणावळा ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल करत तपास सुरू केला.

पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तपासाला वेग देण्याचे आदेश दिले. अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय अधिकारी अमोल मांडवे, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक अविनाश शिळीमकर आणि लोणावळा ग्रामीणचे निरीक्षक दिनेश तायडे यांनी स्वतः घटनास्थळी भेट देऊन तपास पथके तयार केली.

विशेष म्हणजे पीडितेच्या मदतीने संशयिताचे रेखाचित्र तयार करण्यात आले. त्या चित्राची मदत घेऊन परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी बाळू दत्तु शिर्के, रा. जिवन नं. ०१, ता. मावळ, जि. पुणे, या नराधमाला १७ जुलै रोजी अटक केली.

पोलिसांची ही जलद कारवाई म्हणजे अत्याचार पीडितांसाठी मोठा दिलासा आहे. रेखाचित्र तयार करणाऱ्या अधिकाऱ्याने पीडितेला दिलेला मानसिक आधार, तिला दिलासा देण्याचा प्रयत्न, आणि संपूर्ण टीमने दाखवलेली संवेदनशीलता हे समाजासाठी प्रेरणादायी ठरले आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास महिला सहाय्यक निरीक्षक विजया म्हेत्रे करत असून, आरोपीविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# आठ लाखांचे दागिने घेतले, पण पैसे देईना

## पुण्यातील सराफाला फसवणाऱ्या पोलिसावर गुन्हा दाखल

**■पुणे :** उधारीवर घेतलेल्या आठ लाख २२ हजार रुपये किमतीचे सोन्याच्या दागिन्यांचे पैसे न देता सराफाची फसवणूक केल्याप्रकरणी पोलिस हवालदार व त्याच्या पत्नीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी हवालदार गणेश अशोक जगताप आणि त्याची पत्नी अश्विनी (दोघे रा. कावेरीनगर पोलिस वसाहत, वाकड) यांच्याविरोधात चतु:शृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

त्यांच्याविरोधात भवानी पेठेत राहणाऱ्या सराफ व्यावसायिकाने तक्रार दिली आहे. त्यांची औंध परिसरात सराफी पेढी आहे. ओळखीचा गैरफायदा घेऊन जगताप व त्याच्या पत्नीने गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये तक्रारदारांच्या पेढीतून आठ लाख २२ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने उधारीवर घेतले आणि त्याचे पैसे थकवले. तक्रारदारांनी पैसे मागितल्यावर जगतापने टाळाटाळ केली.




फसवणूक झाल्याने तक्रारदारांनी पोलिसांकडे धाव घेतली.

जगतापने यापूर्वीही भवानी पेठेतील एका सराफाची दागिने घेऊन फसवणूक केली होती. संबंधित सराफाने ही माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्यानंतर जगतापला निलंबित करण्यात आले होते.

**फसवणुकीचे आणखी गुन्हे**

गणेश जगतापने मुलीच्या वैद्यकीय शिक्षणासाठी गरज असल्याचे सांगून परिचयातील महिलेकडून ७३ तोळ्यांचे दागिने व १७ लाख रुपये रोख घेतले होते. मात्र, ते परत न केल्याने महिलेने कोथरूड पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरूनही जगतापविरोधात गुन्हा दाखल झाला होता. शिस्तभंगाची कारवाई लपवण्यासाठी आयुक्तालयातील लिपिकाच्या संगनमताने सेवा पुस्तिकेतील एक पान फाडून त्याऐवजी दुसरे पान चिकटविल्याचा आरोपही जगतापवर आहे. या प्रकरणी बंडगार्डन पोलिस ठाण्यात जगताप आणि संबंधित लिपिकाविरुद्ध गुन्हा दाखल होता. या प्रकरणात जगतापला अटकही झाली होती.

# कर्ज काढून वडिलांनी लेकीचं लग्न लावलं... लग्नाच्या १२ दिवसात नववधूला विष पाजलं

**सांगितलेली रक्कम दिली नसल्याने विवाहितेला संपवलं**

मुखेड तालुक्यातील वसुर तांडा येथील ताऊबाईचा विवाह २ जुलै रोजी राठोडवाडीच्या सुधाकर राठोडसोबत झाला होता. लग्नात हुंडा म्हणून ठरलेली रक्कम पूर्ण न दिल्याने सासरच्या लोकांनी तिला त्रास देण्यास सुरुवात केली, असा आरोप आहे. ताऊबाईच्या माहेरच्या लोकांनी सांगितलं की, लग्नाच्या वेळी ६ लाख रुपये हुंडा देण्याचं ठरलं होतं. त्यांनी ५ लाख रुपये दिले सुद्धा. मात्र, उर्वरित १ लाख रुपयांसाठी ताऊबाईला विष पाजण्यात आलं. ९ जुलै रोजी ताऊबाईला उलट्या होऊ लागल्या. तिला आधी मुखेडमध्ये आणि नंतर हैदराबादमध्ये उपचारासाठी दाखल केलं. परंतु, १३ जुलै रोजी तिचा मृत्यू झाला.

**■नांदेड :** नांदेडमध्ये एका नवविवाहितेचा हुंड्यासाठी बळी गेला. ताऊबाई चव्हाण नावाच्या एका महिलेला तिच्या सासरच्या लोकांनी विष देऊन मारल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पोलिसांनी तातडीने कारवाई करत पतीसह सासू-सासऱ्याला अटक केली आहे. लग्नाच्या अवघ्या काही दिवसातच ही धक्कादायक घटना घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

ताऊबाईच्या नातेवाईकांनी पोलिसांना सांगितलं की, हुंड्यासाठीच तिला विष देऊन मारण्यात आलं. या प्रकरणी मुखेड पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करत ताऊबाईचा पती, सासू आणि सासरे अशा तिघांना अटक केली आहे. पोलीस अधीक्षक अविनाशकुमार यांनी सांगितलं की, विवाहितेला विष पाजन्यात आलं? का तिने स्वतः विष प्राशन केलं याचा तपास सुरु आहे.




ताऊबाईच्या वडिलांनी कर्ज काढून तिच्या लग्नासाठी पैसे जमा केले होते. मात्र, केवळ एका लाख रुपयांसाठी तिच्या सासरच्या लोकांनी तिचा जीव घेतला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून परिसरात शोक व्यक्त होत आहे. वडिलाने नातेवाईकांकडून हात उसने पैसे घेऊन लेकीचा विवाह केला होता. मात्र एक लाखासाठी सासरच्या मंडळींनी तिचा खून केला असल्याचं ताऊबाईच्या नातेवाईकांनी सांगितलं.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com